# लॉक डाउन - १.०

(कोरोना काळातील कथा)

शुभम शरद पाटील

# लॉकडाउन – १.०

# (कोरोना काळातील कथा)

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिटे

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची, हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# लॉकडाउन- १.०

(लघूकथा संग्रह)

लेखक

## शुभम शरद पाटील

लॉकडाउन – १.०

लेखक: शुभम शरद पाटील

पत्ता - १. कमलानंद, ३४, डॉ. हेडगेवार नगर,
धरणगांव,(४२५१०५) जिल्हा - जळगांव

२. श्री स्वामी समर्थ नगर भातखंडे बु.॥ (४२४२०१)

फोन नंबर - +९१ ९८२३३ ८६३११

ईमेल - shubhampatil111295@gmail.com

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

Whatsapp: 7710980841

**प्रकाशन :२५ जुलै २०२० (नागपंचमी)**


©esahity Pratishthan®2020

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी- घेणे आवश्यकआहे.



# मनोगत

नमस्कार, मी शुभम, ई-साहित्य वरील माझे हे तिसरे पुस्तक.

२०२० या वर्षाचा इतिहास लिहिताना लेखकांना लेखणीत अश्रूंची शाई वापरावी लागेल यात तिळमात्र शंका नाही. कोरोनाने मानवी जीवनात अनेक आमूलाग्र बदल घडवून आणले. काही चांगले तर काही वाईट. काही ठिकाणी औदर्याचे दर्शन घडले तर काही ठिकाणी मूर्तिमंत क्रूरतेचे. या महामारीने अगदी सगळ्याच ठिकाणी विरोधाभास दाखवून दिला. नव्हे, कसं जगायचं हेच दाखवून दिलं. धर्म, देश, लिंग, वर्ण, पंथ, समाज, अर्थ, भाषा या सर्वांवर कोरोनाने सारखाच जीव लावला आणि जीव घेतला. या नैसर्गिक आपत्तीसमोर विज्ञानसुद्धा काही अंशी झुकले. आता ही आपत्ती नैसर्गिक की मानवनिर्मित हा भाग वेगळा. पण आपण जगायला तरी शिकलो.

लॉकडाउन हा प्रकार सर्वांसाठी सारखा नव्हता. पुस्तकातील कथांची पात्रे तुम्हाला तुमच्या सभोवताली सापडतील. घरात बसून रहाणे हे प्रत्येकाला शक्य नसते. तरीही


गरज नसताना बाहेर पडणे म्हणजे साक्षात मृत्युला आमंत्रण देण्यासारखेच नव्हे का. ओरडून ओरडून यंत्रणेचा घसा कोरडा पडला, तेव्हा जनतेसाठी वामन गोपाळ जोशींच्या संगीत रणदुंदुभि मधील पद आठवते, **“काही नाही पाही जनि मोल । बोल विफल हे । अधम गतति परिणामी ।।”**


तत्पूर्वी, ई-साहित्य प्रतिष्ठान नावाचे भव्य दिव्य व्यासपीठ खुले करून देणाऱ्या श्री सुनील सामंत सर आणि टिम चे मनापासून आभार.

बहुत काय लिहिणे, कृपा निरंतर असो देणे हे विज्ञापना.

-शुभम शरद पाटील.

माझ्या या पुर्वीच्या पुस्तकांच्या कव्हरवर क्लिक केल्यास ती वाचता येतील.



# अर्पणपत्रिका

जगातील सर्व ज्ञात-अज्ञात

कोरोना योद्ध्यांना समर्पित

# लॉकडाउन – १.०

# कोरोना काळातील कथा

# अस्वीकरण

या पुस्तकातील सर्व पात्रं, घटना, स्थळ या काल्पनिक असून त्यांचा वास्तवाशी काहीही संबंध नाही, आढळल्यास तो निव्वळ योगायोग समजावा.

# अनुक्रमणिका

१.० मी अभिमन्यु
२.० खंडोबा उवाच
३.० बदल
४.० बेरोजगार
५.० दुर्मिळ प्रेतयात्रा
६.० क्वारंटईन सॉफ्टवेअर इंजिनीअर
७.० हंपीकर नागेंद्र

# मी अभिमन्यु

मला असं एकाएकी हलकं- हलकं का वाटू लागलं ? एकदम हलकं..... अगदी कापससारखं, शांत आणि शुभ्र, सर्व बंधनातून मुक्त झाल्यासारखं... मला काही झालेले तर नाही ना? म्हणजे मला आठवतय की, मला साधारणतः एका आठवड्यापूर्वी थकवा जाणवू लागला होता. आई म्हणाली होती, “अरे, दिवसभर हॉस्पिटलमध्ये असतो ना, काय तो तुमचा नवीन आजार आला आहे, कोरोना की काय त्यासाठी, मग काम करून थकून जात असशील.”

मी पण विचार केला, खरच तेव्हा हॉस्पिटलमध्ये खूप काम असायचे, डॉक्टर घोलप सरांनी त्या दिवशी मेन मीटिंग हॉल मध्ये तातडीची मीटिंग बोलावली होती. सर्व स्टाफ झाडून हजार होता. सर्वांच्या चेहऱ्यावर एक अनामिक चिंता स्पष्ट दिसत होती. अजेंडा सर्वांना न सांगताच ठाऊक होता. कोरोना. या नवीन महाभयंकर आजाराने जगभरात हाहाकार माजवला होता आणि आता तर तो भारताचे दार ठोठावत होता. आमची तर भीतीने गाळण उडाली होती, जिथे इटली सारखा देश नतमस्तक होत होता, तिथे आपली काय गत होणार या विचाराने मन बेचैन होत होते. आम्ही सर्वजण आपापले स्थान ग्रहण करून बसलो होतो, इतक्यात घोलप सर आले, आम्ही

त्यांना मान म्हणून उभे राहिलो तसे ते म्हणाले, “आतापसून या सर्व पद्धती बंद करा. अजेंडा सांगण्याची गरज नाही असे वाटते, त्यात उगाचच वेळ जाईल. काही दिवसांत तो भारतात देखील येईल आणि या वेळी सैनिकांचे काम नाहीये. प्रत्येक लढाईला बंदूकधारी सैनिक लागत नसतात. आपणच सैनिक आहोत. आतापसून तयारीला लागा, हे एक महायुद्ध आहे. आपली शस्त्रे तयार करून ठेवा, शत्रू बलाढ्य आहे. मूळापासून उखडून फेकायचा आहे. विशेष म्हणजे अदृश्य आहे, इंद्रजीताहून भयंकर आहे, तो तरी काही वेळ दिसायचा, हा तर कायम स्वरूपी अदृश्य आहे. प्रसंग बाका आहे. धिरानं घ्या.” नंतर त्यांनी खूप बारीकसारीक सूचना दिल्या. बेड्सची व्यवस्था बघायला सांगितली, व्हेंटिलेटर किती आहेत. कशा परिस्थितीत आहेत हे बघायला लावले आणि सर्व व्यवस्था लावायला सांगून मीटिंग संपली तेव्हा रात्रीचे नऊ वाजले होते. आतापर्यंतची ही सगळ्यात मोठी मीटिंग होती तब्बल चार तास चाललेली.

घरी येत येत दहा वाजले होते. घरी येताच चहूबाजूंनी प्रश्नांची सरबत्ती सुरू झाली. शांतपणे मी सर्व प्रश्न ऐकून घेतले आणि म्हणालो, “या पुढे असाच वेळ होणार, मनाची तयारी करून ठेवा, कदाचित काही दिवस हॉस्पिटलमध्येच राहावे लागेल.”

आई-बाबांचे चेहरे तर बघण्यासारखे होते.

“अरे, पण तु तर याच वर्षी त्या हॉस्पिटलमध्ये कामाला लागलास ना ?” आई काळजीने म्हणाली.

“हो आई, पण आता परिस्थिती गंभीर आहे.” मी तिला समजावत म्हणालो.

“तुला मोकळा वेळ मिळतच नाही रे, बारावीच्य्या सुट्ट्या तेवढा घरी होतास, नंतर मेडिकलला प्रवेश घेऊन डॉक्टर होईपर्यंत ऊर फुटेपर्यंत अभ्यास केलास आणि लगेच प्रॅक्टीसला जायला लागलास.”

“असू दे गं, आता सवय करून घे त्याची. त्याचं आयुष्य हे असच असणार, डॉक्टर माणूस तो. आता जेवायला वाढ बघू. पोटातले कावळे ओरडून ओरडून थकून गेलेत बघ.”

जेवण करून मला बिछान्यावर जाताच झोप आली. दुसऱ्या दिवशी तर कोरोनाने देशात आपले जीवघेणे जाळे विणायला सुरुवात देखील केली होती. या आजारावर उपचार देखील नव्हता. त्यामुळे आपल्याकडे कुणी कोरोनाग्रस्त आला तरी त्याच्यावर उपचार कसा करायचा ? हा एक गहन प्रश्न होता. देवाच्या कृपेने आमच्या शहरात कुणीच बाहेरून आले नसल्याने फारशी चिंता नव्हती. मला दुपारी माझ्या मित्राचा

उदयचा फोन आला होता, त्याची दुबई ट्रीप छान झाली होती म्हणे. आपण रात्री बोलू असे सांगून मी फोन ठेवला आणि कामाला लागलो.

असेच काही दिवस गेले आणि आता तर कोरोनाने देशात कहर माजवायला सुरुवात केली होती. उदय सारख्या बाहेर देशातून आलेल्या मंडळींना तर घरातच थांबायला लावले होते. देशात तर लॉकडाऊन सुरू झाले होते. सर्व जग ठप्प झाले होते. कुणालाही कुठेही जायला मज्जाव होता. हे सर्व आपल्यासाठीच होते. पण लोकं समजून घेत नव्हते. कसे समजून घेतील? अहो, ज्यांचे हातावर पोट आहे, ते कसे करतील. काय खातील. काय पीतील. त्यांना कामावाचून गत्यंतर नाही. अशा बातम्या बघून मन विषण्ण होत होतं.

रात्री उशिरा मला साक्षात घोलप सरांचा कॉल आला. माझ्या पोटात भीतीचा गोळा आला. मला हॉस्पिटलला जॉइन होऊन सहा महीने झाले. घोलप सरांशी आतापर्यंत मुलाखातीनंतर काही बोलण्याचा प्रसंग आला नव्हता. आतातर त्यांचा कॉल येत होता. मी घाबरतच कॉल उचलला.

“हॅलो अभिमन्यु, कसा आहेस? काय करतोय?”

“हॅलो सर, मी छान, आपण?”

“मला काय धड भरलीये, बर ऐक, उद्यापासून तुझे सर्व समान वगैरे घेऊन ये. काही दिवस हॉस्पिटल हेच आपले घर असणार, घरी तशी कल्पना दे, गुड नाइट.” असे एका दमात बोलून त्यांनी फोन ठेवला आणि मी विचारात गुंग झालो.

सकाळी घरी तशी कल्पना दिली आणि आई अतिशय नाराज झाली. “आई, अगं काही दिवसांचाच तर प्रश्न आहे. मी युद्धावर निघल्यासारखी काय करतेस ?” मी तिची समजूत घालत म्हणालो.

“जाऊ दे त्याला. आता तोच सैनिक आहे. अशी संधी वारंवार नाही येत आणि त्याची काय काळजी करतेस तू. स्वामी आहेत त्याच्या पाठीशी.” वडील आईला समजावत होते.

तयारी करून मी काहीशा संमिश्र भावना मनात ठेऊन मी डोळ्यातल्या पाण्यासह निरोप घेतला. आई तर रडतच होती आणि वडील नेहमीप्रमाणे धीर देत होते. ते देखील मनात रडत होते. पण पुरूषांना उघडपणे रडता येत नाही म्हणे असे कुठेतरी ते ऐकून असावेत बहुतेक.

लॉकडाऊन मुळे रिक्षा वगैरे तर नव्हत्याच. मग पायीच तो चार किलोमीटरचा रास्ता तुडवत निघालो. मुळात तो रोजचा आपला येण्या-जाण्याचा रस्ता आहे यावर माझा विश्वासच बसत नव्हता. कधीकाळी या रस्त्यावर पाय ठेवायला जागा

नसायची इतका तो गजबजलेला असायचा. पण आता येथे चिटपाखरुदेखील नव्हते.

कोरोनाने सगळ्या जगात कहर माजवला होता. साधारणतः पाऊण तासाने मी हॉस्पिटलला पोहोचलो. माझ्या आधी बराच स्टाफ आला होता, बाकीचा अजून यायचा होता. सर्वांना कामे वाटून देण्यात आली. त्याप्रमाणे सर्वजण कामात गुंतलो. दोन-तीन दिवसांनी पिपिई किट आले. घोलप सर याला चिलखत म्हणायचे. हे किट अंगावर चढवून काम करणे म्हणजे तारेवरची कसरत होती. सकाळी घातलेला किट रात्री उशिराच काढायला मिळायचा. अंग पुर्णपणे घामाने भिजून जायचे. रात्री थोडाफार वेळ मिळाल्यावर घरी फोन लावायचो तेव्हा थोडीफार माहिती मिळायची. एरवी बाहेरील जगाशी पुर्णपणे संबंध बंद होता. कालच आईने फोनवरून संगितले की “तिरूपती बालजींचे मंदिर पण बंद झाले.”

“मग त्यात काय, सर्व देवस्थाने बंद झाली ना, त्यात हे पण आले असेल.” मी सहजच म्हणालो.

“अरे, या मंदिराचा इतिहास वेगळा आहे, गेल्या २५०० वर्षांपासून हे मंदिर सुरूच होते.” आई म्हणाली.

“अरे बापरे, मला हे नव्हते माहीत.” मी अतिआश्चर्याने म्हणालो. निसर्ग मात्र कुणावर काय वेळ आणेल हे सांगता येत

नाही. आज त्याने देवांनासुद्धा बंद केले होते. मग काही वेळ सहकाऱ्यांशी गप्पा मारायला म्हणून बसलो. त्यात कळले की आमच्यातल्या एका सहकार्याच्या नातेवाईकचे लग्न घरच्या-घरी पार पडले. आम्हाला फार आश्चर्य वाटले. आम्ही त्याला सविस्तरपणे विचारले. तर त्याने संगितले की, काही नाही, वधू, वर, दोघांचे आई-बाबा आणि गुरुजी एवढीच मंडळी होती. घरातल्या हॉल मध्ये लग्न लागले आणि किचन मध्ये पंगती उठल्या. हा प्रकार एकूणच छान होता. पैशाची बचत, मानापमान नाही. सगळं कसं एकदम स्वस्त आणि सुटसुटीत.

दुसऱ्या दिवशी सकाळी जाग आली तेव्हा धावपळ सुरू झाली होती. मी विचारणा केल्यावर कळले की दुबई हून आलेल्या ग्रुपच्या मंडळींचे रिपोर्ट पोसीटिव्ह आले होते. आता या मंडळींना कोरोना झाला होता आणि आम्हाला यांना बरे करायचे होते. बरं या महामारीवर इलाज देखील नव्हता. मग आम्ही आमच्या परीने प्रयत्न सुरू केले. रोगप्रतिकार शक्ती वाढीसाठी गोळ्या-औषध सुरू केल्या. रुग्णांशी मनमोकळ्या गप्पा मारायला सुरुवात केली. जेणेकरून त्यांना सकारात्मक वाटेल अशा उपाययोजना करायला सुरुवात केली. एकूण दहा जण आले होते. आम्ही यांना टि.व्ही. दाखवणे पुर्णपणे बंद केले होते. कारण आपली मीडिया कोरोना विषयीच्या सर्व नकारात्मक बातम्यांनी पेटून उठली होती. एखाद्या कमजोर

दिलाच्या व्यक्तीने जर या बातम्या पहिल्या असत्या तर तो मानसिकरीत्याच कोरोनाग्रस्त झाला असता, मग आम्ही यांना रामायण-महाभारत दाखवायला सुरुवात केली. जेणेकरून आम्हाला आणि यांना प्रेरणा मिळेल.

आमच्या या उपक्रमाला सर्व रुग्ण अतिशय सकारात्मक प्रतिसाद देत होते. मग परिणाम व्हायचा तोच झाला, सर्व दहाच्या-दहा जण कोरोनामुक्त झाले. त्यांना ही आनंदाची बातमी दिली तेव्हा त्यांच्या डोळयात आनंदाश्रू उभे राहिले. काही जण तर चक्क आमच्या पाया पडायला लागले. आम्हाला एकदम संकोचल्यासारखे झाले. आम्ही फक्त आमचे काम केले होते. या चांगल्या कामामुळे आमच्या सर्वांवर समाजातून अभिनंदनाचा वर्षाव झाला. आम्हालादेखील खूप धन्यता वाटली. आमचा होणारा असा सन्मान पाहून ऊर अभिमानाने भरून आला. आई-बाबांना पण सर्व ओळखीपाळखीचे लोकं खूप शुभेच्छा देत होते. खचितच त्यांना माझ्यामुळे समाजात खूप मान मिळत होता आणि आपल्या मुलाच्या कर्तुत्वामुळे समाजात आपला सन्मान व्हावा यापेक्षा चांगली गोष्ट ती काय, असो,

सगळीकडे कोरोना, कोरोना आणि कोरोना. थैमान घातला होता राव या रोगाने. असेच एका दिवशी रात्री सहा-

सहा फुट अंतर ठेऊन गप्पा मारत बसलो होतो. आपल्याला पुर्वीसारखे मनसोक्त जगता येईल का? या विषयावर परिसंवाद चालला होता. कुणी म्हणत होतं की निसर्गाने मानवाला चांगला धडा शिकवला आहे, कुणी म्हणत होत की आता काही पूर्वीसारखं नाही जगता येणार, बंधांनातच राहावं लागेल वगैरे. इतक्यात डॉक्टर घोलप आले. ते आमच्यात बऱ्यापैकी सीनियर. त्यामुळे त्यांच्याविषयी एक आदरयुक्त भीती सर्वांच्याच मनात असायची. त्यांचा व्यासंग फार मोठा. त्यामुळे बोलताना ते अशी काही उदाहरणं द्यायचे किंवा अशी अगम्य भाषा वापरायचे की समोरचा अगदी मंत्रमुग्ध होऊन जयचा. आज त्यांनी कोरोना विषयी बोलताना संगितले की, “हा आजार रक्तबीज या राक्षसासारखा आहे. हा रक्तबीज कोण तर साक्षात दुर्गा देवीने मारलेल्या असुरांपैकी एक. ह्याचं एक विशेष होत म्हणे, त्याच्या रक्ताचा एक थेंब जरी जमिनीवर पडला तरी तसाच दूसरा राक्षस तयार व्हायचा. त्याच्या रक्ताचा थेंब पडला की परत राक्षस, म्हणजे जितके थेंब तितके राक्षस. हळूहळू संपूर्ण पृथ्वी या प्रजातीच्या राक्षसाने व्यापून टाकली. जिकडे पहावे तिकडे रक्तबीज... आणि हाच रक्तबीज आज नाव बदलून आला आहे, त्याचे नवीन नाव आहे कोरोना...!!!”

त्यांनी सांगितलेल्या महितीचा विचार करत-करत मी केव्हा निद्राधीन झालो, माझे मलाच कळले नाही. दुसऱ्या

दिवशी तर पाच पोलिस मामा तपासणीसाठी आले होते. त्यांची तपासणी करताना त्यांच्यात कोरोनाची प्राथमिक लक्षणे अढळत होती. त्यांच्यावर तातडीने उपचार करून त्यांना लवकरात लवकर बरे करून त्यांना आम्ही हसतमुखाने निरोप दिला. मला त्यांचे विशेष आश्चर्य वाटले. आम्हाला तरी रात्री आडवं पाडण्यासाठी काहीतरी होतं. त्यांना तर ती सुद्धा सुविधा नव्हती. जे मिळेल ते खायचं आणि ड्यूटी करायची, जीव धोक्यात घालून. खायला देखील मिळेल याची शाश्वती नसायची. मी त्यांना मनातूनच सलाम ठोकला.

काही दिवस असेच गेले. रुग्ण येत होते आणि जात होते. कोरोना या नावाची दहशतच अशी होती की, साधा ताप किंवा खोकला आला तरी त्याला कोरोना समजत होते. मग अशा रुग्णांना आम्ही औषधे देऊन आणि कोरोना विषयी भीती न बाळगण्याची ग्वाही घेऊन पाठवत होतो.

दोन दिवसांपासून मला श्वास घेण्यास त्रास होत होता. मी थोडे दुर्लक्ष केले. दिवसभर मास्क घातले असल्याने तसे होत असेल असे मला वाटले. कारण ते मास्क लावल्याने थोडे गुदमारल्यासारखे व्हायचे. हळू-हळू मला सवय झाली मग. त्यातलाच हा भाग म्हणून मी सोडून दिले. हल्ली थकवा देखील जास्त प्रमाणात जाणवू लागला होता. मला सहकाऱ्यांनी थोडा

विश्रांतीचा सल्ला दिला. मी नाही म्हटल्यावर घोलप सरांचा धाक दाखवून मला विश्रांतीसाठी परावृत्त केले. एक-दोन दिवस जरा औषधे वगैरे घेऊन आणि आराम करून मला बरे वाटू लागले होते. या काळात मी घरी आई-बाबांशी बोललो होतो, सर्व मित्र, नातेवाईकांना फोन लावले होते. सर्वांनी मला काळजी घेण्यास सांगितली होती. सर्वांच्या आवाजात माझ्याविषयीची काळजी दिसून येत होती. मग परत मी कामावर रुजू झालो.

आज काही विशेष काम नव्हते. त्यामुळे काही थकवा जाणवला नाही. पण अधून-मधून श्वास घेण्यास त्रास होत होता म्हणून मी माझी स्वैब टेस्ट करण्याचे ठरवले. मी टेस्ट करत असताना घोलप सर अतिशय आत्मियतेने माझी चौकशी करायला आले होते. घरी जातोस का? अशी विचारणा केली होती. पण मी त्यांना नम्रपणे नकार दिला होता तेव्हा ते अतिशय आनंदित होऊन म्हणाले होते की, “बाळ अभि, तूच खरा डॉक्टर, आपले आयुष्य हे असेच. निखाऱ्यावरचे चालणे. दुसऱ्याच्या आरोग्यासाठी आपले आयुष्य झोकून देणे हेच आपल्या आयुष्याचे नैतिक कर्तव्य. ते जाऊ दे, आता कसं वाटतय तुला?”

“आता ठीक आहे सर,”

“बर झालं, टेस्ट करून घेतलीस तर. उगाच शंका नको. सांभाळून रहा. येणारा काळ कठीण आहे. चल येतो मी.” असे म्हणून ते मला काही बोलू न देताच निघून गेले.

जेवण वगैरे झाल्यावर मी रात्रीच्या गप्पांच्या मैफिलीला काही गेलो नाही. अजून श्वास घ्यायला थोडा त्रास होत होता आणि औषधांची गुंगी देखील येत होती. बिछान्यावर जाताच केव्हा झोप लागली ते कळलेच नाही. रात्री दोन-अडीच च्या सुमारास जाग आली तेव्हा मला प्रचंड त्रास होत होता. जवळपास कुणीच नव्हते. हाका मारण्यासाठी म्हणून तोंड उघडले जात होते पण आवाजा निघतच नव्हता. जसे काही कुणीतरी माझा आवाजच माझ्यातून काढून घेतला आहे. कसातरी उठून उभा राहिलो आणि जवळच ठेवलेल्या जार मधून पाणी घेण्यासाठी जाणार तोच तोल गेला आणि खाली पडलो. परत उठण्याचे त्राणच नव्हते शरीरात. थोड्यावेळाने कसातरी पलंगाला धरून उभा राहिलो आणि औषध घेतलं. परत झोपलो.

चार-साडेचार च्या सुमारास मला श्वास घ्यायला प्रचंड त्रास होऊ लागला. जणू काही कुणीतरी माझा गळा दाबून ठेवला आहे. सोबतच रक्तदाब देखील मोठ्या प्रमाणात वाढल्याचे जाणवू लागले. वेदनांमुळे आवाज तर निघतच

नव्हता. मी असह्य वेदनांनी तळमळू लागलो. सहस्त्रावधी काटे अंगावर एकाच वेळी टोचले जात असल्याचा आभास होत होता. मी मरणार-बिरणार तर नाही ना? अशी एक उद्विग्न शंका मनात आली. कधीकधी मृत्युची जाणीवच माणसाला भयभयीत करत असते. मला तर खरे काय नी खोटे काय, हेच कळेनासे झाले होते. या परिस्थितीत मग मी आयुष्यातील आनंदाचे क्षण आठवू लागलो. नकारात्मक विचारांना मारण्यासाठीचे अस्त्र म्हणून. मला आठवू लागला तो क्षण, मेडीकलला प्रवेश घेतल्याचा.... डॉक्टर झाल्याचा...पहिला रुग्ण बरा केल्याचा....आई-बाबांना वेगवेगळी उपचार पद्धती समजावून सांगताना त्यांच्या चेहऱ्यावरील न मोजता येणारा आनंद बघितल्याचा...असे अनेक क्षण आठवू लागले. नव्हे, तशा क्षणांची रांगच रांग लागली. मुंग्यांसारखी. या मुंग्या देखील आठवणरूपी साखर आणायला एका रांगेत जात होत्या आणि मनरूपी वारुळात ती अवीट गोडव्याची आठवणरूपी साखर उगाचच भरत होत्या....

मग मला थोडं शांत आणि हलकं- हलकं वाटू लागलं. काही वेळाने मी उठून बसलो. थोडे धूसर दिसत होते. अगदी पातळ. विशेष म्हणजे मघापसून होणारा सर्व त्रास आता अचानक पुर्णपणे बंद झाला होता. गंमत म्हणजे मी आता पुर्णपणे बरा झाल्यासारखा वाटत होतो. किंबहुना इतका की

आता काहीच त्रास होणार नाही असा. एक मिनिट, असे कसे होऊ शकते? मी तर आजारी होतो ना? मग हे असे अचानक बरे कसे वाटायला लागले? मी भ्रमात आहे की काय? काहीच समजत नव्हते. मी उठून रूमच्या बाहेर जाण्याचा प्रयत्न केला तर दरवाजा न उघडताच रूमबाहेर आलो. मला याचे फार आश्चर्य वाटले. समोरच्या घड्याळात बघितले तेव्हा सकाळचे सहा वाजले होते. शेजारच्या अनिरुद्धला उठवायला गेलो तर तो माझ्याआधी उठलेला. मग त्याच्याशी बोलायला लागलो तर तो माझ्याकडे लक्षच देईना. जणू काही माझा आवाज त्याला ऐकूच येत नसावा. मग मी रागाने माझ्या रूममध्ये आलो तर अहो आश्चर्यम ! मी तिथेच झोपलेलो होतो. मग मघाशी रूम मधून बाहेर गेला तो कोण होता? असे कसे होऊ शकते? मी मलाच पहात होतो. शांतपणे झोपलेला.

इतक्यात अनिरुद्ध माझ्या खोलीत आला आणि मला हाका मारू लागला. मी त्याला प्रत्यूत्तर देत होतो पण त्याला थोडेसेही ऐकू येत नव्हते. तो घाबरून जवळपास पळत-पळत निघून गेला. माझे डोके सुन्न झाले. असे का होत असावे? सकाळीपण त्याला माझा आवाज येत नव्हता. हा प्रकार मला काही उचित वाटत नव्हता. थोड्याच वेळात सर्व स्टाफ आला. डॉक्टर घोलप यांनी मला तपासले आणि म्हणाले, “हि इज नो मोअर....”

खिन्नपणे ते रूम बाहेर आले आणि म्हणाले, “खूप चांगला होता तो.”

“होता म्हणजे? नक्की काय झाले डॉक्टर?” अनिरुद्ध अतिशय घाबरून म्हणाला.

“अरे, तो आता या जगात नाहीये. त्याच नाव त्याने सार्थ केलं अभिमन्यु... महाभारतातल्या अभिमन्यु सारखाच लढला, नशिबी वीरमरण आले. या पेक्षा थोर भाग्य ते काय... कोरोनाशी लढता-लढता गेला. वीरमरण पत्करले त्याने या महायुद्धात. त्याचा जन्म सार्थकी लागला. रणांगणात मृत्यू यावा यापेक्षा श्रेष्ठ ते काय. तुझे अश्रु पुसायला आम्ही आहोत अनिरुद्धा, पण याच्या आई-बाबांचे अश्रु कोण पुसेल? त्यांच्या अश्रूंचा फुटलेला बांध कुणाला तरी आवरता येण शक्य आहे काय? अनिरुद्धा याच्या घरी कळव. मला ते धैर्य नाही होणार भल्या माणसा.”

घोलप सरांचे ते बोलणे ऐकून मला आश्चर्याचा धक्का बसला. म्हणजे  या कोरोनाच्या धगधगत्या यज्ञकुंडात माझी देखील आहुति पडली होती तर. मी स्वाहा झालो होतो तर. असे म्हणतात की यज्ञात टाकलेली आहुति थेट स्वर्गात जाते म्हणे. मग मी कुठे जाणार होतो? माझे मलाच माहिती नव्हते. मुळात मी माझ्यातून केव्हा विलग झालो होतो तेच समजले नव्हते.

कोरोनाने मला केव्हा मगरमिठीत घेतले याचा पत्ताच लागू दिला नाही.

आता मी जगात नव्हतो तर...........

†††

# खंडोबा उवाच

सायंकाळची तिरपी किरणे गडावर पडली होती. वैशाख महिन्याचे उष्ण वारे मंद गतीने वहात होते. त्यामुळे झाडाच्या पानांची सळसळ ऐकू येत होती. पिकलेली पाने त्यामुळे गळून पडत होती. कधीच परत न येण्यासाठी. स्वतःहून झाडाशी आपला सबंध तोडत होती. आपण पिकलो, पिवळे झालो, आपला कार्यभाग संपला असे वाटताच ती गळून पडत होती. गडावरुन जवळची झाडे मोठी दिसत होती आणि दूरची झाडे त्या गळून पाडलेल्या पानांसारखी. दुरूनच कुठेतरी पक्ष्यांचा थवा उडत होता. दुसऱ्या दिवसाचे अन्न शोधण्यासाठी. आज एका झाडावर, उद्या दुसऱ्या मग परवा तिसऱ्या, अशी त्यांची भटकंती आयुष्यभर सुरूच असते. ते एका जागेशी मोह ठेवत नाहीत. त्यामुळेच कदाचित इतके स्वाच्छंदपणे उडू शकत असावेत बहुतेक.

कधीपासून उधळलेला भंडारा तसाच पडून होता. त्यामुळे सोन्याची जेजूरी ओकिबोकी दिसत होती. कधी कडेपठाराकडे, कधी पक्ष्यांच्या थव्याकडे, कधी दूरवर नजर जाईल तिथपर्यंत देव बघत होते. भलेमोठे ललाट भंडाऱ्याने भरले होते. त्यांचा जटाभार खांद्यापर्यंत रूळत होता. पगडी घातली नसल्याने त्यांचे ते रूप भयावह दिसत होते. भयावह

होते ते असुरांसाठी. भक्तांसाठी तर ते मंगलमयच होते. एक हात कमरेवर तर दुसऱ्या हातात भलामोठा त्रिशूळ चमकत होता. अस्वथपणे देव गडाच्या तटबंदीभोवती फेऱ्या घालत होते. इतक्यात त्यांचे लक्ष कडेपठारच्च्या पायथ्याशी गेले. पन्नसेक मेंढया, त्यांच्या अवतीभोवती तीन – चार शिकारी कुत्रे आणि या सर्व लावाजम्यामागे भालीमोठी घोंगडी पाठीवर ठेऊन काठीचा आधार घेऊन ऐंशीतले धनगरबाबा चालले होते. त्यांचे भलेमोठे डोळे कुणालातरी शोधत होते. पण ते त्यांना सापडत नाही हे त्यांच्या डोळयांतच दिसत होते.

इतक्यात मागून घुंगरांचा थोडासा अस्पष्ट आवाज येऊ लागला. हळूहळू तो वाढत होता. तो म्हाळसा देवींच्या पैंजणाचा आवाज होता. प्रसन्न वदानाने देवी मल्हारींकडे येत होत्या. “बराच वेळ झाला आता येतो सांगून गेलात ते अजून आला नाहीत महालात. एक प्रहर झाला असेल. सारीपाटाच्या अर्ध्या खेळातून उठलात. ते न बोलताच बाहेर आलात.”

“एकाच वेळी इतके प्रश्न ? देवी, थोडं थांबाल का ? श्वास तरी घ्या आणि आम्हालापण घेऊ द्या.” मार्तंड शांतपणे हसत म्हणाले.

समोरून बाणाई एका रत्नजडीत ताटात पगडी घेऊन येत होत्या. सोबत त्या काहीतरी गुणगुणत होत्या. त्या

जसजश्या जवळ येत होत्या, तसतसा तो आवाज स्पष्टपणे ऐकू येऊ लागला. बाणाई मुरळी गात होत्या. जवळ येताच त्या गायचं थांबल्या. त्यांनी ते रत्नजडीत ताट देवांपूढे केले. देवांनी पगडी घातली आणि परत दूरवर नजर फिरवू लागले. मग बाणाईकडे वळून म्हणाले, “देवी आता आपण काय म्हणत होतात?”

“मी, ते काही नाही असच,” बाणाई जरा संकोचाने म्हणल्या.

“आपण जे म्हणत होतात त्यासाठी मी आतुर आहे, अस्वस्थ आहे. म्हणा ती मुरळी.” देवांनी विनंतीवजा आज्ञा केली.

बाणाईंनी एक कटाक्ष म्हाळसाईंकडे टाकला, त्यांनी थोडीशी मान डोलावतच त्यांनी आढेवेढे घेणे सोडले आणि आपल्या मधुर आवाजात मुरळी म्हणायला सुरुवात केली. तिचे बोल असे होते,

**“हळदीकुकानी वटी माझी भरली**

**खंडेरायची झाले मी मुरळी**

**आईबापानं नवस हा केला**

**कन्या वाहिली मल्हारीला**

**त्याच्या नामाची गोडी आगळी**

**खंडेरायची झाले मी मुरळी**

**सारी नाती मी देवाशी जोडली**

**त्यानं हुकूमानं मला इथं धाडली**

**सदा मल्हार माझ्याजवळी**

**खंडेरायची झाले मी मुरळी"**

देव शांतपणे डोळे मिटून मुरळी ऐकत होते. कानांची तहान भागवत होते. मुरळी संपताच त्यांनी प्रसन्नपणे डोळे उघडले. कितीतरी दिवसांनी त्यांच्या चेहऱ्यावर अशी प्रसन्नता पाहून म्हाळसा आणि बाणाईना आश्चर्य वाटले. त्यांनी एकमेकांकडे बघितले आणि एकदमच प्रश्न विचारण्यासाठी तोंड उघडले. त्या काही बोलणार तोच देवांनी बोलायला सुरुवात केली.

"तुम्हा दोघांना मला असे आनंदित बघून आश्चर्य वाटले असेल ना. त्याला कारण देखील तसेच आहे. कितीतरी दिवसांनी मी माझी प्राणप्रिय मुरळी ऐकली. कितीतरी दिवसांनी. तुम्ही माझ्या सेवेत मग्न आहात, हे मला ठाऊक आहे. तुम्ही तत्परतेने मला काय हवं नको ते बघतात. माझी मर्जी सांभाळतात. मी तुमच्यात सरीपाट खेळतो, ते केवळ तुम्हाला

चांगले वाटण्यासाठी. एरवी मी माझ्या भक्तांच्या वाटेकडे डोळे लाऊन बसलो आहे. मला माझ्या भक्तांची ओढ लागली आहे. आनंदाने भंडारा उधळणारे ते भक्त अजून माझ्या चक्षूंसमोरून जात नाहीत. जातील कसे, रोज त्यांना हा असाच उत्सव पहायची सवय लागली होती ना. आज कितीतरी दिवसांनी मुरळी ऐकून कान तृप्त झाले आमचे.”

“पण देवा, या महामारीच्या संकटकाळात आपले भक्त घरी बसूनच आपली भक्ति करत आहेत, हे आपणास माहिती नाही का ?” म्हाळसा देवांना समजवण्याच्या सूरात म्हणल्या.

“ते आम्हाला उत्तम प्रकारे ठावे आहे देवी. पण रोज लाखोंच्या संख्येने येणारे भक्तगण असे अचानक बंद झाल्यावर मनाला आवर तरी कसा घालणार.” खंडोबा आगतिकतेने म्हणाले.

“त्याला काही पर्याय आहे का देवा, काळासमोर सर्वकाही फिके आहे.” बाणाई म्हणाल्या.

“खरंय तुमचं देवी, पण ही महामारी देखील गरजेची होती.” काहीशा निर्धाराने देव म्हणाले.

“काय म्हणताय देवा? हा अगणित मानवी संहार गरजेचा होता.” बाणाई अतिआश्चर्याने जरा चढया आवाजात

म्हणल्या. बोलताना त्यांचे डोळे अचानकच मोठे झाले. आपला आवाज जरा वाढला असे लक्षात येताच बाणाई खाली मान घालून एक पाय मागे सरल्या. खंडोबांच्या तसे लक्षात येताच ते मंद हसले आणि बाणाईंना पुढे बोलावले.

"तुमचं म्हणणं अगदी रास्त आहे देवी. पण हे खरे आहे की ही महामारी देखील तितकीच गरजेची होती. निसर्गाचा समतोल ढळत चालला होता, जगातून माणुसकी हद्दपार व्हायच्या मार्गावर होती, क्रूरतेने कळस गाठला होता, जागोजागी मूर्तीमंत क्रूरतेचे दर्शन घडत होते. माणुसकी फक्त नावालाच उरली होती. माणूस माणसाला पारखा होत होता. त्यामुळे हे सर्व गरजेचे होते. मानव प्राणी काही काळाने वेळोवेळी त्याच चुका करत असतो. त्यामुळे धडा शिकवणे हे आगत्याचे ठरते."

"पण या सर्वांत सर्व सामान्य सज्जनांचे काय? आपल्या भक्तांचे काय?" म्हाळसा देवींनी मध्येच प्रश्न उपस्थित केला.

"त्यांना काही होणार नाही देवी. चिंता नसावी. कधी कधी भावनिक दुराव्यात देखील एक अदृश्य जवळीक निर्माण होत असते. एक विश्वास निर्माण होत असतो. आपल्याला काही होणार नाही याचा. हीच श्रद्धा तारून नेत असते. त्यामुळे माझे भक्त कायम निश्चिंत असतात."

“हे सर्व ठीक आहे पण कधी - कधी याच निश्चिंत असण्याचा गर्व वाटू लागला तर.” बाणाई म्हणल्या.

“होय, तसे तर होणारच. काळाचा महिमा अगाध आहे. कालांतराने त्यांना तसे वाटणे स्वाभाविक आहे. मणी – मल्लाला देखील तसेच वाटायचे की आपल्यापेक्षा कुणीही श्रेष्ठ नाही. पण आमच्यासमोर त्यांनी हार मानलीच ना. आणि भक्तांचे म्हणाल तर त्यांना मी तरतोय. पण जो चुकेल त्याला मात्र शिक्षा ही होणारच.”

“मग त्याचा भक्ति करून काय फायदा?” म्हाळसा देवींनी प्रश्न उपस्थित केला.

“फायदा.... फायदा, लोभ, या व्यावहारिक गोष्टी भक्तीत आल्या की तो संपला देवी.”

“मग शिक्षेचं बोललात ते.” बाणाईंनी मागील प्रश्नाची आठवण करून दिली.

“प्रारब्ध..., होय प्रारब्ध हेच त्याला करणीभूत असते देवी. बाकी सर्व निमित्तमात्र. आम्ही फक्त त्याची तीव्रता कमी करणारे. घरातून बाहेर निघू नका असे संगितले तरी जर कुणी निघत असेल तर त्याला बळी पडावेच लागेल. पण त्याची आमच्यावर निस्सीम भक्ति असली तर त्यालादेखील लागण

होईलच पण तो निदान आमच्या कृपेने बरा तरी होईल. त्याला वाटणारी भीती कमी होईल. सकारात्मक ऊर्जेची कंपन त्याला तारुन नेतील, याच सकारात्मक उर्जेमुळे तो बरा होईल आणि आभार मात्र आमचे मानेल. विचित्र आहे की नाही.''

''या महामारीचा नाश करण्यासाठी आपण काहीच का नाही करत. कितीतरी निष्पाप जीव यात बळी जात आहेत. त्यांच्या जगण्याच्या इच्छा आपुऱ्या रहात आहेत. जगण्याची खरी मजा यायला आता कुठे सुरुवात झाली आहे असे वाटत असतानाच ते आयुष्याला पारखे होते आहे. या सर्वांतून काय साध्य होत आहे देवा. थांबवावा आता हा संहार.'' बाणाई पोटतिडकीने म्हणल्या.

''तुम्हाला खरच असे वाटते काय की आम्ही काहीच केलेले नाही अजून. दवाखान्यात दिवसरात्र राबणाऱ्या त्या वैद्यबुवांकडे जरा बारकाईने पहा, आपल्या जिवाची पर्वा न करता अखंडपणे कोरोनाग्रस्तांवर उपचार करणाऱ्या त्या धाडसी वीरांकडे पहा. रणरणत्या उन्हात उभे राहून आपले कर्तव्य बाजवणाऱ्या पोलिसांकडे जरा निरखून पहा. अन्नपाण्याची पर्वा न करता ते आपले काम चोखपणे करत आहेत. चोवीस तास उभे आहेत. गोरगरिबांना अन्नपाण्याची व्यवस्था करणाऱ्या संस्था, लोकं यांच्याकडे पहा थोडं.

आम्हीच त्यांच्या रूपात महामारीला तोंड देत आहोत. त्यांच्यातच आम्हाला बघा. त्यांना जिवाची पर्वा न करता कामाला उद्युक्त करणारी ती अदृश्य प्रेरणा, शक्ति आम्हीच आहोत. निःसंशय त्यांना तथा त्यांच्या कुटुंबीयांना काहीही होणार नाही याची आम्ही ग्वाही देतो. त्याग फार मोठा असतो देवी, जिंकायचे असेल तर त्याग हा करावा लागतोच लागतो. जेवढा असीम त्याग तेवढी जास्त विजयाची चव चाखयला मिळते. विचार करा जेव्हा हे योद्धे महामारी संपल्यावर घरी जातील तेव्हा त्यांच्या कुटुंबात किती आनंद होईल. त्या आनंदाला वर्णन करण्याला काही सीमा आहेत काय?"

"माफी असावी देवा. आमच्या लक्षात नाही आलं ते." बाणाईं जरा खालच्या आवाजात म्हणल्या.

मग काही वेळ कुणीच काहीच बोलले नाही. आकाशाचा रंग आता फक्त आकाशी राहिला नव्हता. त्या लालबुंद तेजाच्या गोळयाच्या अवतीभवती कितीतरी असंख्य रंगछटा उमटल्या होत्या. ते आकाश जणू एखाद्या जातिवंत चित्रकारचे चित्रच वाटत होते जणू. तिघेही स्तब्धपणे ते दृश्य पहात होते. कुणालाच काय बोलावे ते सुचत नव्हते.

**"वारी हो वारी |**

**देई का गां मल्हारी ||**

**त्रिपुरीरी हरी |**

**तुझ्या वारीचा मी भिकारी ||"**

"दरवर्षी ऐकू येणारे हे बोल देखील ऐकू येणार नाहीत देवी." खंडोबा हसत म्हणाले.

"म्हणजे वैष्णव या वर्षी त्यांच्या माहेरी जाणार नाहीत?" म्हाळसा आश्चर्याने म्हणल्या.

"नाही."

"बेलभंडाऱ्याची मुक्तपणे उधळण करीत जेजूरी नागरी पादाक्रांत करणारे वारकरी या वर्षी बघण्याचे भाग्य नाही तर." बाणाई उदास होऊन गडावरुन दिसणाऱ्या रस्त्याकडे बघत म्हणल्या. हा तोच रास्ता होता, ज्यावरून असंख्य वारकरी मार्ग क्रमत. आता हा रास्ता रिकामा दिसणार म्हणून नाराज होऊन बाणाईंनी तोंड वळवले. कडेपठारावरील मंदिराचा झेंडा उगाच वाऱ्याने फडफडत होता. त्यावर दृष्टी केन्द्रित करून बाणाई म्हणल्या,

"मग आता या घरात बसलेल्या जनतेच काय देवा? त्याबद्दल काही उपदेश."

"अवश्य देवी, केव्हाही चांगल्यातून वाईट शोधावे देवी. ही मानवजात परमार्थिक सुखाच्या मागे इतकी लागली

आहे की त्यांना स्वतःचा विसर पडला आहे. जिथे स्वतःचा विसर पडला तिथे कुटुंब कुठून आठवणार. लहान-लहान बालकांना बाहेर ठेऊन ही जात स्वतःचे पोट भरते आणि ज्यासाठी कामावतात तो जीव मात्र यांच्या मायेपासुन अलिप्त रहातो, जेव्हा सगळ्यात जास्त गरज असते तेव्हा. मग यांच आयुष्य हे असच निघून जातं. जे बोलायचं ते राहून जातं. आज कितीतरी वर्षानी घरातील सर्व लोकं एकत्र जेवत असतील. या आनंदाची सर कशालाही करता येणार नाही. घरातील वडीलधाऱ्यांशी कसे वागावे हे मूल्यसंस्कार आजची तरुण पिढी विसरत चालली आहे. मोठ्या व्यक्तींशी कसे बोलावे, कसे वागावे, हे आत्मसात करण्यासाठीच घरी बसावे लागले असे मी म्हटलो तर त्यात नवल वाटण्याचे मुळीच कारण नाही देवी."

"धन्य आहे देवा तुमची. आपला एक - एक शब्द म्हणजे अमृतचा कण आहे. जीवनाला संजीवनी देत आहे. पण तरीही एक शंका मनात आहे. हे झाले सधन कुटुंबाचे, पण ज्यांचे पोट हातावर आहे, त्यांचे काय? त्यांना तर प्रत्येक दिवस काळ होऊन येत असेल. त्यांचे काय?" म्हाळसा.

"या भारतवर्षातील आर्थिक विषमता याला करणीभूत आहे देवी. पण घाबरण्याचे काही कारण नाही. सेवाभावी

संस्था, दानशूर व्यक्ती यांच्या मदतीला आहेतच आहेत. सगळीकडे गरजूंना अन्न, धान्य, जीवनावश्यक वस्तूंचे वाटप सुरू आहे. या संस्थांना, व्यक्तींना या निस्सीमपणे केलेल्या दानाने अमाप असे पुण्य प्राप्त होणार आहे. एकवेळ मला अभिषेक केला नाही तरी चालेल, पण या गरजूंना मदत केल्यास त्यांनी दिलेला आशीर्वाद हा आम्ही दिलेल्या आशीर्वादपेक्षा कितीतरी पटींनी शक्तीशाली असतो. कारण या सृष्टीच्या चराचरात मीच असतो. फक्त तो बघण्याची दृष्टी मात्र प्रत्येकाची वेगळी असते. ही महामारी यावच्चन्द्रदिवाकरौ समस्त पृथ्वीवासीयांना एक चांगलाच धडा शिकवणार आहे. लग्नताली भरमसाठ उधळमाप थांबणार आहे. प्रदूषण कमी होऊन पृथ्वी परत एकदा मोकळा श्वास घेणार आहे. अजून बऱ्याच चांगल्या गोष्टी ही महामारी शिकवणार आहे आणि लक्षात ठेवा ही महामारी आहे त्यात समाधान मानून जगायला शिकवणार आहे. यानंतर मनुष्य प्राण्याला कळेलच की विज्ञानाने कीतीही प्रगती केली तरी निसर्गासमोर तो एक कळसूत्री बाहुलीच आहे आणि राहणार आहे.”

“खरं म्हणजे आम्हाला देखील खूप कंटाळा आला होता. असा मोकळा वेळ कधी मिळालाच नव्हता. रोज त्याच एका जागेवर बसून आलेल्या भक्ताचे म्हणणे ऐकून घ्यायचे आणि त्याला आशीर्वाद द्यायचा. हाच दिनक्रम वर्षानुवर्षे

सुरूच होता. अगदी थकून गेलो होतो. त्यामुळे हा विश्राम. पण आता पुरे झाले, काही महिन्यांतच सर्वकाही सुरळीत होईल. भारतवर्ष पुन्हा एकदा वायुवेगाने आपली विजयी घोदौड सुरू ठेवेल. परत कधीच मागे वळून बघणार नाही. कधीही नाही......"

देवांचे असे बोलणे ऐकून म्हाळसा आणि बाणाई यांच्या चेहऱ्यावर संमिश्र भाव उमटले. डोळे विस्फरून त्या समोरील स्थितप्रज्ञ मूर्तीकडे एकटक बघू लागल्या. नव्हे, त्या विचारात पडल्या. आता ऐकले ते खरे की खोटे, देव म्हणतात की आम्हाला भक्तांची ओढ लागली आहे आणि इकडे म्हणतात की आम्ही कंटाळलो होते. नक्की खरे काय समजावे. मग हा अपरिमित संहार देवांच्या इच्छेने सुरू आहे काय? की देव हतबल झाले आहेत. नक्की काय सुरू आहे? त्या दोघांना असे गोंधळलेले बघून देव मोठयाने हसले आणि मंदिराकडे चालू लागले.......

†††

# बदल

“है गह्यरं चांगलं व्हयन. आते कालदिन पास्थीन मी बी जासू के इकाले.”

“कारे पोऱ्या, कोरोना चालू शे आनी तू काय इचार करी राह्यना.”

“आपल्या के ले काय भाव भेटस आसा बी, आनी कोरोनानं कोनता व्यापारी ली राह्यना. त्यान्ह्यासाठे मी दारवर के इकाना इचार करी राह्यंथू .”

“घरमा बठाले सांगेल शे तं घरमा बठ ना. कोठे चालना के इकाले.”

“ओ आबा, तुम्हले कई समजत नई. मुगमुग बाठीसन खा. जे ताट म्हा ई राह्यनं ते.”

“राह्यनं भो, माले काय करनं शे. ईक, के ईक का आम्हले इक.”

शेतकऱ्यांचा माल हा अत्यावश्यक सेवेत समाविष्ट केला असून त्यांना आता तो थेट ग्राहकांपर्यंत विकता येणार आहे. ही बातमी ऐकुन सख्याच्या आनंदाला पारावर उरला नव्हता. सख्या एकुलता एक होता. जळगाव जिल्ह्यातील एक

बागायतदार शेतकरी होता. त्याचा केळीचा बाग होता. जमीन चांगली होती, भरपूर पाणी होते, सख्या सहकुटुंब – सहपरिवार शेतात राबायचा. त्यामुळे उत्पन्न भरपूर व्हायचे. गेल्या काही वर्षांपासून नैसर्गिक आपत्तिमुळे म्हणा किंवा भाव मिळत नसल्यामुळे म्हणा घरात जेमतेम पैसा येत होता. घर चालत नव्हते असे नाही. पण शिल्लक काहीच रहात नव्हते. जेवढा काही पैसा यायचा तेवढा परत मजुरी, खत यांच्यात चालला जायचा. त्यामुळे हा व्यक्ति सतत चिंतेत असायचा. सख्या लोभी होता. ही गोष्ट त्याला सोडून गावातील सगळ्यांना मान्य होती. बायकोसकट. कायम त्याच्या मनात पैशाचा विचार सुरू असायचा. प्रत्येक बाबतीत कंजूसपणा हा तर त्याचा स्वभावच झाला होता. पाच वर्षांच्या लहान मुलाला देखील तो शेतात काम करायला घेऊन जायचा. हे पाहून गावातील लोकांना त्या लहान जिवाची कीव यायची. सोबतच सख्याचा राग देखील. ह्या लहान, नाजुक फुलासारख्या मुलाला शाळेत पाठवायचे सोडून तो शेतात पाठवायचा. या प्रकारामुळे त्याच्या मुलाची शरीरिकच नव्हे तर बौद्धिक वाढ देखील खुंटली होती. घरच्यांना तर तो कच्चे खाऊन गेला होता. त्यामुळे त्याला बोलण्याची कुणाची शामत नव्हती. गावात देखील त्याचे हॉटेलवाला बाळू भोई, गाडीवला कुशल असे दोन-तीन जण सोडले तर कुणाशीच पटत नव्हते. हिच मंडळी त्याला वाटेल

ते बोलू शकायची. आतातर त्याने डोक्यात नवीनच खूळ घातले होते. त्याच्या शेतातील केळी जिल्ह्याच्या गावाला - जळगावला दारोदार विकायला घेऊन जाणार असे म्हणत होता. दारोदार नाही निदान दिवसभर तीन-चार चौकात केळी विकण्यासाठी उभा राहणार होता. या कोरोना काळात सर्वजण घरात असताना त्याच्या कुठल्याशा मित्राने असेच द्राक्ष विकून काही दिवसांतच खूप पैसा मिळवला होता म्हणे. सख्या अशाच संधीची वाट पहात होता आणि आतातर ही आयती संधी चालून आली होती. या संधीचे सोने करायचे असे त्याने ठरवले होते आणि तो इरेला पेटला होता. सायंकाळी सातच्या सुमारास त्याने ही बातमी ऐकली आणि त्याने सरकारला खूप धन्यवाद देत आता मरेपर्यंत तुम्हालाच मत देईल अशी मनातच खूणगाठ बांधत कुशलचे घर गाठले.

“काकू, कुशल शे का घरमा?” ओसरीवर आपल्या नातवंडांना खेळवत असलेल्या कुशलच्या आईला त्याने विचारले.

“शे ना. कुशल हौ सख्या उना रे.” कुशलच्या आईने त्याला हाक मारली.

सख्याने बाजूला पहिले. कुशलची मालवाहू गाडी उभी होती. ती बघून त्याला हायसे वाटले. गरीब कुशलचे पोट या

गाडीवरच होते. कुशल गरीब होता, पण समाधानी होता. कुशलचे नुकतेच जेवण झाले होते. रुमालाला हात पुसत कुशल आला आणि तोच रुमाल खांद्यावर टाकत विचारले, “काय व्हयनं रे?”

“आपले कलदिन पास्थीन जयगाव जवानं शे.” सख्या आनंदात म्हणाला.

“काब रे भो?” कुशलने प्रश्न केला.

“के इकाले. बातम्यास्मा देखं मी. आपले कोनी कई बोलाऊ नई.” सख्या संदर्भासाह स्पष्टीकरण देत म्हणाला.

हे ऐकताच कुशलच्या कपाळावर आठ्या पसरल्या. आठयांचे जाळे कमी करीत तो म्हणाला, “साला, तू तं मरशी, पण आम्हले बी ली मरशी. घर मा बठाले सांगेल शे तं फिराना बाता करी राह्यना.”

“आपन कोठे लोकस्मा जाई राह्यनूत, गाडीमा बशीसन के इकूत ना.”

“सख्या मन्हा घरमा धाकलं लेकरू शे, आई-दादानं वय बी गच्ची हुई जाएल शे आते. कोठे रिकामी उपादी घर मा लऊ. मले नई जमाऊ भो हाई.”

“मन्हा घर थांबजो भो. मी तुल्हे रोजना रोज पैसा दी टाकसू.”

“पैसास्नी गोट नई शे, तुन्हा डोकामा कस ई नई राह्यनं. जगशी वाचशी त कामावशी अन खाशी न. देख एकदा ईचार कर यान्हावर.”

“हाईच ये शे कमावानी. तुल्हे ध्यान मा ई राह्यनं का? तू कईच करजो नको. बठी राह्यजो नुस्ता. चाल ना रे. काब जीव ली राह्यना. तुन्हाफा गाडी शे म्हनीसन उनू.”

“तू कई आईकौ नई. कितला वाजता जवानं शे.” कुशलने विचार केला, गाडीचे हफ्ते भरायचे आहेत, असेपण आता काम नाही. मग काळजी घेऊन याच्यासोबत जायला काय हरकत आहे.

“नऊ वाजता निंघूत. दुपारे दोन-तीन वाज्याशे ई जाउत. गाडी वावरमा लाई दे. सकायले भरसू.”

सख्या अत्यानंदात घरी आला. जेवण करता-करता त्याने त्याचे उद्याचे नियोजन घरातल्या सगळ्यांना सांगितले. अपेक्षेप्रमाणे या कार्यक्रमाला घरातील सगळ्यांनी विरोध केला. पण सख्या आता ऐकण्याच्या पलीकडे गेला होता. सकाळी लवकर शेतात जाऊन केळी गाडीत भरून शक्य

तितक्या लवकर निघण्याचा त्याचा मानस होता. त्यामुळे घरच्यांचा विरोधाला न जुमानता तो अंगणातल्या खाटेवर आडवा झाला. डोळा लागतो न लागतो तोच त्याला काहीतरी आठवले आणि त्याने फोन हातात घेतला. केळीचा भाव विचारण्यासाठी त्याने व्यापऱ्याला फोन लावला होता. सुमारे विस ते तीस रुपये डझन असा भाव त्याला व्यापऱ्याकडून माहिती पडला होता. त्यामुळे त्याच्या मालाचा भाव ठरवता ठरवता त्याला केव्हा झोप लागली, त्याचे त्यालाच कळले नाही.

तांबड फुटायच्या आताच तो शेतात हजर होता. सांगितल्याप्रमाणे कुशलने गाडी रात्रीच शेतात लाऊन ठेवली होती. दोन-अडीच तासांत सख्याने गाडीत माल भरून ठेवला आणि कुशलची वाट पाहू लागला. ठरल्याप्रमाणे नऊ वाजता कुशल आला. सख्या तयार होताच. त्याला बघतच कुशलचा तोंडाचा पट्टा सुरू झाला, “महिती होतं माले, तू काई मास्क लावाव नई ते. मी आनेल शे ते लाव.”

“मन्हा जीव गुदमरस रे भो त्यान्हामा.”

“जाऊ दे मंग, मी नई येत.”

कुशलचा असा पवित्रा बघून सख्याने मास्क लावण्याचे मान्य केले आणि पैसे घेतल्यानंतर प्रत्येक वेळी हातावर

सॅनीटायझर लावण्याचे कबुल करून गाडीत बसला. लॉकडाऊन असले तरी जीवनावश्यक वस्तूंसाठी दुपारची वेळ निश्चित करण्यात आली होती. त्यामुळे रस्त्यावर कुणीच नव्हते. कुशलने वाऱ्याच्या वेगाने गाडी पळवली. जळगावला एका चौकात गाडी थांबवली. तीस रुपये डझन भावाने तो केळी विकू लागला. खरं म्हणजे हा भाव जळगावच्या मानाने थोडा जास्तच होता. कारण जळगाव म्हटलं म्हणजे केळीच. तरीही लोकं त्या भावात घेत होते. कारण दूसरा पर्याय नव्हता. आधीच जीवनावश्यक वस्तू मिळण्यासाठी तारेवरची कसरत होती.

तीन-चार तासांतच सख्याचा सगळा माल विकला गेला. त्यामुळे तो भलताच खुश झाला. एक म्हणजे त्याचा माल त्याने स्वतः विकला होता, भाव त्याने ठरवला होता, व्यापाऱ्याच्या पाया पडाव्या लागल्या नव्हत्या. त्यामुळे स्वारी अतिशय आनंदात होती. इकडे याची विक्री सुरू असताना मात्र कुशल ड्रायव्हर सीटवरच बसून होता. वेळोवेळी हात सॅनीटायझर ने स्वच्छ करत होता. मास्क तर त्याने काढलेच नव्हते. सर्व विक्री झाल्यावर सख्या परत घरी जाण्यासाठि म्हणून कुशलच्या बाजूला बसणार तोच कुशलने त्याला हटकले आणि मागे बसायला लावले. सख्या तयार होईना. कुशलने त्याला समजावले की तो लोकांच्या संपर्कात आला असल्याने त्याला बाजूला बसू देणे उचित नाही. कसाबसा

सख्या तयार झाला. सख्याने गाडी परत शेतात लावला लावली आणि दोघे पायीच घरी गेले.

आतातर त्यांचा नित्यक्रम सुरू झाला. जळगाव शहरात विक्री झाल्यावर ते आजूबाजूच्या तालुक्यांच्या ठिकाणी केळी विकण्यासाठी जाऊ लागले. सख्याच्या शेतातली केळी संपल्यावर त्याने गावातील शेतकऱ्यांच्या केली स्वस्तात विकत घेऊन स्वतः विकायला सुरुवात केली. सख्या आता शेतकऱ्यासोबतच हंगामी व्यापारी देखील झाला. कुशलला रोजचे पैसे मिळत होते आणि मुख्य म्हणजे तो वेळोवेळी काळजी घेत असल्याने निर्धास्त होता. पण सख्याविषयी त्याच्या मनात थोडी चिंता होतीच. सतत लोकांच्या संपर्कात आल्यामुळे सख्याला कोरोनाची लागण तर होणार नाही ना, ही चिंता त्याला भेडसावत होती. तो त्याला आता जवळ बसूच देत नव्हता. सख्यापण आता भरपूर बदलला होता. त्याने आता केळीचा भाव प्रती डझन दुप्पट करून टाकला होता. तो भावात तडजोड करत नव्हता. गिर्हाइकांशी बोलण्यातला गर्विष्ठपणा आता जाणवेल इतका वाढला होता.

एकदा तालुका ओलांडत असताना पोलिसांनी यांची गाडी अडवली. विचारपूस केल्यावर काही हरकत नसल्याचे सांगून गाडीला वाट मोकळी करून दिली. कुशलने त्या

पोलिसांकडे बघितले. त्यांचे चेहऱ्यावर कामाचा ताण स्पष्टपणे जाणवत होता. जीवघेण्या उन्हात आणि कोरोनात ते आपले कर्तव्य बजावत होते. त्यांना थोडी केळी द्यावी असे कुशलच्या मनात आले. त्यांच्या कामाचे कौतुक करण्यासाठी त्याच्याकडे दुसरे काय होते. हस्तांदोलन वगैरे तर करू शकत नव्हता. त्याने खाली उतरून तसे सख्याला बोलून दाखवले. त्यावर सख्या म्हणाला, ‘‘कई गरज नई त्यास्ले. गन पगार लेतस.’’

‘‘पगारनी गोट नई शे सख्या आठे, बिचारा त्यास्न घरदार सोडीसन आठे उभा शेतस. आपलसाठेच उभा शेतस ना.’’

‘‘मंग, मी काय करू.’’ सख्या निर्विकारपणे म्हणाला.

‘‘तू काईच नको करू. आज माले जरासा कमी पैसा देजो. मी मान्हा पैसास्नी देस यास्ले.’’ कुशल थोडा रागतच म्हणाला.

‘‘माले काई तरास नई.’’ सख्या निर्लज्जपणे उत्तरला.

शेवटी कुशलने सख्यकडून केळी विकत घेतली आणि पोलिसांना दिली. पोलिसांना देखील कुशलचे कौतुक वाटले. दोघांना काळजी घ्यायला सांगून पोलिसांनी परत एकदा आभार मानले आणि निरोप दिला. सख्या मागे बसला होता. इकडे

कुशलच्या मनात कुठेतरी समाधानाची भावना होती. काहीतरी चांगलं केल्याचा त्याला आनंद झाला होता. सख्याच्या मनात, डोळ्यासमोर, हातात आता रात्रंदिवस पैसा पैसा आणी पैसाच नाचत होता. त्यामुळे आता त्याला स्वर्ग दोन बोटं उरला होता. सकाळी घरातून निघताना तो घरात त्याच्याविषयीची चिंता देऊन जायचा आणि घरी परतातच घरातील लोकांचा जीव भांड्यात पडायचा. कुशलच्या घरी काही वेगळे नव्हते. पण हा व्यवस्थित काळजी घेत असल्यामुळे घरचे बऱ्यापैकी निश्चिंत असायचे.

असेच काही दिवस उलटले. एका कोऱ्या पानांच्या वहीसारखे. कोरे आणि पांढरे. भीतीने गर्भगळीत आणि पांढरेफटक झालेले. एके दिवशी कुशल गाडीत बसला होता. नेहमीप्रमाणे सख्याची भर उन्हात विक्री सुरू होती. त्याच्या गाडीच्या दारावर टक-टक झाले. त्याने वळून पहिले, तिथे एक चाळीसीतली स्त्री तिच्या तान्हुल्याला कडेवर घेऊन काहीतरी मिळेल या आशेने उभी होती. तिच्या एकंदरीत देहबोलीवरून ती बऱ्याच दिवसांपासून उपाशी होती असे वाटत होते. तो लगेचच गाडीतून खाली उतरला आणि मागील वेळेप्रमाणे सख्याशी भांडत न बसता त्याच्याकडून भरपूर केळी विकत घेतली आणि त्या स्त्रीला दिली. तोच तिच्या डोळ्यातून आसवे वाहू लागली. ती कुशलच्या पाया पडण्यासाठी म्हणून खाली

वाकु लागताच विजेचा शॉक लागल्यासारखा कुशल मागे झाला. कुठल्यातरी अगम्य भाषेत त्या स्त्रीने कुशलला आशीर्वाद दिले आणि समोरच असलेल्या दुकानाच्या पायऱ्यांवर बसून केळी खाऊ लागली. असे विदारक दृश्य बघून कुशलच्या डोळयांत देखील पाणी आले. पण तो तरी काय करू शकत होता. खिन्नपणे तो परत गाडीत बसला आणि सख्याची विक्री पूर्ण होण्याची वाट पाहू लागला. आज त्याला सख्याचा खूप राग आला होता. पोलिसांच्या वेळी ठीक होते, पण आता.... आता मात्र हद्द झाली होती. त्याने जवळपास सख्याशी बोलणे बंद केले होते. तो बोलेल तेवढेच बोलायचा. सख्याचा देखील हे लक्षात आले होते. पण तो विचार करायचा, हे सगळे माझ्या प्रगतीवर जळतात.... पण कुशलचे काय, तो कितीही नाराज असला तरी पैशासाठी सख्याला सोडत नव्हता ना. तो देखील वाहत्या गंगेत हात धुवून घेत होता.

मास्क लाव, हातांना सॅनीटायझर लाव असे वारंवार सांगून कुशल आता थकला होता. शेवटी त्याने सख्याशी बोलणेच बंद केले होते. व्हायचा परिणाम तोच झाला. जळगाव जिल्ह्यातल्या कडक उन्हाळयात सख्याला काही न खाता-पिताच खोकला सुरू झाला. कुशलला शंका आली. त्याने तसे सख्याला तसे संगितले. आतापर्यंत बिनधास्त असणारा सख्या आता मात्र चेहरा पडून बसला. त्याच दिवशी त्या दोघांनी

कोरोना चाचणी करून घेतली. कुशलने खबरदारी म्हणून त्याच्या आणि सख्याच्या घरी फोनवर चाचणीविषयी संगितले. इथेच घोळ झाला. एकाअर्थी चांगलं झालं.त्याचं असं झालं, गावात नेटवर्क प्रॉब्लेम असल्याने कुशलच्या लहान भावाला अंगणात येऊन जोरात बोलावे लागले. गल्लीतील घरे एकमेकांना लागूनच. त्यामुळे लोकांनी अंदाज बांधून वार्ता वाऱ्याच्या वेगाने पसरवली. गावातील सरपंच, पाटील वगैरे मंडळी चिंतेत. कारण, या दोघांना गावात घ्यायचे नाही हे तर न सांगताच ठरलेले. पण त्यांची व्यवस्था कुठे करायची हा देखील गहन प्रश्न. बाहेर गावाहून आलेल्या मंडळीला जिल्हा परिषदेच्या शाळेत आदरतीथ्य करण्यासाठी ठेवलेले. आता या दोघांचा सत्कार आणि सेवा कुठे करायची ही वेगळीच अडचण. शेवटी सख्याच्या शेतातच दोघांना क्वारंटाईन करायचे ठरले.

सायंकाळी चाचणी करून येत असतानाच त्यांच्या स्वागतासाठी गावातील पुढारी मंडळी उभी होती. गावाच्या वेशीवरच तांची गाडी थांबवण्यात आली. सख्या मागे बसला असल्याने अचानक गाडी का थांबवली हे त्याला कळले नाही. तो गाडीखाली उतरला आणि त्याने त्याच्या स्वागतासाठी आलेला लवाजमा बघितला. त्याच्या लक्षात येईपर्यंत

मंडळींनी त्याला शिव्यांची लाखोली वाहायला सुरुवात केली होती.

“कोठे शे रे तो सख्या?” सरपंचांनी कुशलला विचारले. तो काही बोलणार तोच त्यांना सख्या येताना दिसला.

“उनात का शेठ, परसाद लीसन.” पाटलांनी सख्याला दरडवून विचारले.

“देखा, अजून कई आम्हले कोरोना नई व्हाएल शे. आम्ही नुसतं चेक करेल शे. तीन दिन कन रिपोट येतीन तव्हय बोला आम्हले.” सख्या सारवासारव करत म्हणाला.

“मंग, तुम्हले तं आम्ही मंदिरम्हा ठेवणार शेतस.” पाटील.

“देखा त्या रिपोट येतीन तव्हय येतीन, तुम्हले क्वारंटाईन होनं पडीन.” सरपंच

“कोठे?” सख्या.

“तुन्हा वावर मा.” सरपंच

“तू नई म्हन का हा म्हन. ईतला दूरथीन लोकं उनात आपला गाव म्हा. एकले बी सोड नई. तुम्ही तं आपला मानसे शेत. चाचणी करेल. तुम्हले कसं सोडसूत? एक ईचार करी ठेवा,

तुम्हना पाह्यरे जर कोरोना गाव म्हा घुसना तर तुम्हले तुम्हना घरदार संग गाव मधीन भाईर काढसूत. गाव इसरी जा मंग.” पाटील तावातावाने बोलत होते आणि गावाची मंडळी त्यांना साथ देत होती.

शेवटी एक चकार शब्द न काढता दोघं सख्याच्या शेतात राहायला गेले. यथावकाश तीन-चार दिवसांत दोघांचे रिपोर्ट आले. सख्या पॉसिटीव्ह होता आणि कुशल निगेटिव्ह. रिपोर्ट बघताच सख्याच्या तोंडाचे पाणी पळाले. डोळ्यांपुढे अंधारी आली. डोके गरगरू लागले. इतके दिवस आपल्याच गुर्मीत असणारा सख्या त्या एका कागदाच्या तुकड्याला पाहून घाबरला होता. कागद, किती प्रकारचा असतो ना, काही दिवसांपूर्वी अशाच कागदांच्या बंडलांकडे पाहून तो खुश व्हायचा. कारण त्या पैशांच्या नोटा असायच्या आणि हा कागद तर त्याच्या समोर ठाकलेल्या मृत्यूसूचक संकटाचे प्रमाणपत्र होता. नव्हे ही तर त्याच्या मागील दिवसांत, आयुष्यात केलेल्या कामांची पावती होती. वाईट कामांची. हा सख्याच्या कर्मयोग होता. त्याच्या वाईट कर्मांचे फळ तो भोगत होता. सख्या जिल्हा रुग्णालयात होता. आता सख्याच्या शेतात त्याचे कुटुंबसुद्धा राहला आले होते. गावकऱ्यांनीच तो हितावह निर्णय घेतला होता. कुशल मात्र बरा होऊन घरी आराम करत होता. सख्याविषयी चिंता होतीच, पण तो सुद्धा काय करू शकत

होता. त्याने सर्वतोपरी वारंवार सख्याला बजावले होते. कर्मफळ भोगणे देवांनासुद्धा चुकले नाही, सख्या तर एक सर्वसाधारण लोभी मनुष्यप्राणी होता.

यथावकाश आठवडा उलटला. सख्याने कोरोनावर मात केली. त्याच्या दुर्दम्य इच्छाशक्तीच्या बळावर. कारण दवाखान्यात सकारात्मक असे काहीच नव्हते. तिथली माणुसकी मूग गिळून गप्प झाली होती. एक आजीबाई मृत अवस्थेत शौचालायात तब्बल आठ दिवस पडून होत्या. शेवटी दुर्गंध यायला सुरुवात झाली, तेव्हा कर्मचाऱ्यांना जाग आली. या अशा वातावरणात सख्या रहात होता. नकारात्मकेच्या दलदलीत तो फसला होता. काहीही झाले तरी सख्या देखील माणूसच होता. त्याने आजूबाजूला पहिले, तिथे सर्व प्रकारचे लोकं होते, कोरोनाग्रस्त म्हणून. तिथे धर्मभेद नव्हता, जातीयवाद नव्हता, वर्णभेद नव्हता. काही काही म्हणून विषमता नव्हती. श्रवणतील घनगंभीर मेघ जसे भेदभाव न करता आंब्याच्या, नारळाच्या झाडावर बरसतात त्याचप्रमाणे बाभळीच्या, बोराच्या आणि निवडूंगच्या झाडावर देखील तसेच बरसतात. कोरोना देखील तसाच सर्वांवर बरसत होता. समभाव ठेऊन. इथे सख्याने जगणे शिकले. पैशापेक्षा जीव महत्वाचा असतो, हे त्याला इथे समजलं. तो स्वतः स्वतःवरच खजील झाला. त्याच्या आतापर्यंत वागण्याचा त्याला पश्चाताप

येऊ लागला. आठवढाभराच्या चिंतनाने तो आतबाहेरून ढवळून निघाला.

त्याला बरं वाटत असल्याचे पाहून डॉक्टरांनी त्याला डिस्चार्ज दिला. तो दवाखान्यातून बाहेर पडताना कोरोना सोबतच त्याचा लोभीपणा, अहंकार, गर्व सर्वकाही तिथेच ठेऊन आला....

†††

# बेरोजगार

रात्रीचा एक वाजला होता. सायंकाळपासून रिमझिम बरसणारा पाऊस आता मुसळधार कोसळू लागला होता. अधून – मधून विजा देखील चमकत होत्या. विजांमुळे होणाऱ्या लख्ख प्रकाशामुळे दोन सेकंद का होईना सभोवतालची सृष्टी दिसत होती. बाहेरील सुकलेली झाडे एखाद्या पिशाच्चासारखी दिसत होती आणि विजेचा प्रकाश जाताच लुप्त होत होती. वाऱ्यामुळे पानांची प्रचंड सळसळ होत होती. प्रत्येक पानाचा आवाज हा त्याचे अस्तित्व जपण्यासाठी धडपडत होता. अस्तित्व म्हणजे तरी नक्की काय असत? आपले असणे. या असण्याने कुणाला फरक पडत असला तर ठीक. नाहीतर काही नाही. मधूनच मांजराचे डोळे चमकत होते. अचानक ढगांचा मोठा गडगडाट होत होता. मधून मधून येणारे बेडकांचे आवाज देखील बंद झाले होते. कदाचित पावसाच्या आवाजात त्यांचा आवाज फिका पडत असावा. एखाद्या श्रीमंतपुढे गरिबाचा पडतो तसा. संपूर्ण गावातील विज सायंकाळपासूनच गायब झाली होती. मध्यरात्र उलटून गेली तरी शुभमचा डोळा लागला नव्हता. आता तर त्याला ही सवयच झाली होती. सुमारे सात - आठ महिन्यांपासून त्याला शांत झोप नव्हती. तो शांतपणे केव्हा झोपला होता, त्याचे त्यालाच आठवत नव्हते. त्याने कूस बदलून पाहिली, पांघरून पहिलं पण झोप काही येईना. त्याने

आजूबाजूला बघितले. घरातील सर्वजण शांतपणे झोपले होते. तो हळूच उठला आणि जिना चढू लागला. अंधार असल्याने एकदोनदा धडपडला देखील. दरवाज्याचा आवाज होणार नाही अशी काळजी घेत त्याने हळूच दरवाजा उघडला. बाहेर गच्चीवर आला. इथे पावसाचे रौद्ररूप अजून जास्त धडकी भरवत होते. पण शुभमला त्याचे काहीच देणेघेणे नव्हते. त्याच्या मनाची अवस्था देखील काही वेगळी नव्हती. तो पावसात गच्चीवर उभा राहिला आणि समोरील दृश्य पाहण्याचा प्रयत्न करू लागला. काहीच दिसत नव्हते तरी पहात होता. दोन वर्षांपूर्वी देखील तो असाच उभा होता. तेव्हादेखील तो असाच होता, बेरोजगार....

त्या मुसळधार कोसळणाऱ्या पावसात त्याच्या मनात देखील आठवणींच्या सरी कोसळू लागल्या. सरी कसल्या, त्या तर त्याच्या मागील दोन वर्षांच्या आठवणी होत्या. अतिशय कडवट आणि विषारी. हलाहल विषासारख्या. पण प्रत्येक हलाहल पचवायला रुद्र लागतो. शुभम देखील तसाच रुद्र होऊन ते विष पचवण्याचा प्रयत्न करू लागला. त्या काळ होऊन कोसळणाऱ्या पावसात एक – एक आठवण त्याच्या मनःचक्षु समोर उभी राहू लागली. त्याला दोन वर्षे मागे लोटून त्या वाईट आठवणींच्या खाईत लोटू लागली.

शुभम एक मेकॅनिकल इंजिनीअर होता. पुणे विद्यापीठातून सुमारे ऐंशी टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाला होता. तेव्हा त्याला जॉब नव्हता. मग सहा – सात महीने भरपूर ठिकाणी प्रयत्न केल्यावर त्याला एका मल्टीनॅशनल कंपनीत डेव्हलपमेंट मध्ये जॉब लागला. तेव्हा तर त्याला आकाश ठेंगणे झाले होते. पण हा जॉब इतका सोपा नव्हता. कामाच्या पहिल्याच दिवशी त्याला तब्बल बारा तास थांबावे लागले होते. दुसऱ्या दिवशी चौदा तास. मग नियमाप्रमाणे तो कधी आठ तास थांबला असे झालेच नाही. रोज बारा तास काम तर ठरलेलेच असायचे. अनेक वेळा त्याच्या मनात यायचे की आता बस्स... बंद करावे हे सर्व आणि निघावे इथून. पण पुढच्याच क्षणी त्याच्या मनात विचार यायचा की इथून गेल्यावर तरी काय करणार? हाच जॉब मिळवायला किती कष्ट लागलेत आणि त्यात हा सोडला म्हणजे दूसरा लगेचच भेटेल अशी शाश्वती मुळीच नाही. मग परत तो अंग झटकून कामाला लागायचा.

त्याच्या दोन महिन्यानंतर अभिलाष लागला होता. त्याचा एकदम राजेशाही कारभार होता. त्याच्या पाच महिन्याने प्रसाद जॉइन झाला होता. मग दीड वर्षाने पुजा. हे चौघे एकाच डिपार्टमेंटला, सारख्याच हुद्दयावर होते. पण शुभमवर खूप अन्याय होत होता. तो सकाळी साडे आठ ची ड्यूटी

पकडण्यासाठी साडे सहाला घर सोडायचा. बस, टू व्हीलर, ट्रक जे मिळेल त्याने कंपनीत आठ वाजेपर्यंत पोहोचायचा. सोबतची मंडळी पावणेनऊ पर्यन्त यायची. मग आरामशीर कामाला लागायची. यांना कामाशी काही देणेघेणे नव्हते. तोपर्यन्त शुभम कामाला जुंपलेला असायचा. शुभमचे काम मशीनवर असायचे. त्याला डिझाईन यायचे, मशीन प्रोग्रामिंग यायची, बाकी इतर लीगल डॉक्युमेंट्स तयार करता यायची. एक मेकॅनिकल इंजिनीअर म्हणून जे यायला हवे त्यापेक्षा कितीतरी अधिक यायचे. रात्री केव्हा सुट्टी होईल याची काहीच कल्पना नसायची. रात्री आठ, नऊ, कधीकधी बारा देखील वाजायचे. मग इतक्या रात्री हायवे वर उभे राहून मिळेल त्या वाहनाला हात देऊन रात्री उशिरा घरी पोहोचायचा आणि परत सकाळी साडेसहाला घर सोडायचा. हे दृष्टचक्र अविरतपणे सुरूच होते. पण तरीही शुभम हे सहनच करत होता कारण त्याला गरज होती. त्याच्या तुटपुंज्या पगारावर घर चालत होते. त्यामुळे त्याला या नरक यातना भोगणे क्रमप्राप्त होते.

अचानक एका दिवशी त्याला कळले की अभिलाष कायम झाला. याच्या हृदयाचे ठोके चुकले. पण आशा वेडी असते. आपले पण काम होईल या विचाराने तो अजून जोमात काम करू लागला. अभिलाष आणि शुभम चांगले मित्र होते. अभिलाषच्या प्रमोशननंतर देखील त्यांच्या मैत्रीत काही फरक

पडला नाही.  मग एका महिन्याने प्रसाद कायम झाला. आता मात्र शुभमच्या मनाचा संयम सुटत चालला होता. डिपार्टमेंट हेड ला विचारले तर ते करू, करू सांगून वेळ मारून न्यायचे. मग हा उदास होऊन परत कामाला लागायचा. असेच काही महीने गेले. मग एका दिवशी त्याला हळूच बातमी कळली की पुजाचे देखील कन्फर्मेशन झाले. शुभमला आता मेल्याहून मेल्यासारखे झाले. या सगळ्यांत तो एकटा सीनियर होता. सुट्टीच्या दिवशी देखील यायचा. चक्क दोन वेळा तो तीन पूर्ण शिफ्ट कंपनीत थांबला होता. काम चांगले होते. कितीही वेळ थांबण्याची तयारी होती. पण तरीही याचे काम झाले नव्हते. सगळ्यांनी फक्त शुभमचा वापर करून घेतला होता. नंतर त्याला कळले की, अभिलाष, प्रसाद आणि पुजा या तिघांचे मोठे वशिले होते. कंपनीत प्लांट मॅनेजरशी ओळखी होत्या. आपल्या याच ओळखींचा वापर करून वशिल्याने हे सर्वजण कंपनीत कायम झाले होते. त्यामुळेच ते उशिरा येत, लवकर जात, हात तर मुळीच काळा वगैरे करत नसत. ह्यांना सर्व माफ होते.

मग हा भला माणूस नैराश्यात जाण्याच्या उंबरठ्यावर होता. सकाळी जाताना त्याच्या मनात विचार यायचा, का चाललो आपण? काय करायला? अपमान... मानहानी... काय केले आपण इतके दिवस काम करून? प्रामाणिकपणे काम

करण्याची हीच शिक्षा असते का? का झाले आपल्यासोबत असे? प्रामाणिकपणाला बाहेरच्या जगात काहीच किंमत नाही. यशस्वी व्हायचे असेल तर तुम्हाला चांगले वागून वा कष्ट करून काम करावे लागते असे नाही. हेच सूर्यप्रकाशाइतके निखळ सत्य आहे. तथापि रत्नांची पारख गाजरपारख्यांना झाली नाही तर तो दोष काही त्या रत्नांचा नसतो. दिवसरात्र त्याच्या मनात असेच विचार यायचे. त्यामुळे तो झोपेला पारखा झाला होता. कधी आपला करार संपून आपण इथून मोकळे होतो असे त्याला वाटायचे. शेवटी तो दिवस आला आणि त्याचा करार संपला. तो पर्यन्त शुभम फक्त शरीराने कंपनीत जात होता. मनाने तो खूप खचून गेलेला होता.

आता लगेचच त्याला पुण्याला जायचे होते. वेळ वाया घालवण्यात काही अर्थ नव्हता. सर्व तयारी झाली होती तोच कोरोना महामारीने भारतात प्रवेश केला. लॉकडाऊन सुरू झाले आणि नशीब आजमावायला निघालेल्या शुभमची पावले नियतीने जागेवरच थांबवली. अनिश्चित काळासाठी आता त्याला घरात थांबणे भाग होते. काम नाही तर पैसा नाही. त्यामुळे एखाद्या महिन्याच्या पगारात कसे भागणार हा गहन प्रश्न तर आ वासून उभा होता. खिन्न मनाने शुभम दिवस घालवत होता. येणारा प्रत्येक दिवस त्याच्यासाठी गतिरोधक म्हणून येत होता. त्याच्या नशिबाची, कर्तुत्वाची, आयुष्याची, सुखाची

गती रोखण्यासाठी. इथे घरातून निघणेच अशक्य होते. तर मुलाखतीला कसे जाणार आणि कोण बोलवणार. दिवस तर कसाबसा निघून जायचा पण रात्र मात्र वैरी होऊन सोबत करायची. लॉकडाऊन मुळे सर्व जग ठप्प झाले होते, त्यात या तरुणाची दळभद्री कहाणी समजून घेऊन त्याला पोटापाण्यासाठी काहीतरी कामधंदा देईल असं कुणीच सापडत नव्हतं. सापडेल कसं, लॉकडाऊन मुळे सर्वजण घरातच बसून होते. कंपन्याही बंद पडल्या होत्या. जिथे थोर अनुभवी व्यक्तींना लॉकडाऊन मुळे आपल्या नोकरीची शाश्वती नव्हती तिथे याचा काय निभाव लागणार होता. त्याची अवस्था फणा नसलेल्या भुजंगसारखी झाली होती. किंबहुना तो सिंह गुहेत कैद झाला होता. शिकार करण्याची इच्छा, उमेद, अनुभव सर्वकाही असताना....

ज्या तरुण वयात घरच्यांना काहीतरी करून दाखवायचे असते तेव्हा मी घरी बसून आहे. ज्या वयात पालकांनी माझ्या उमेदीवर गावात मिरवले पाहिजे. माझ्या कर्तुत्वाने त्यांची मान समाजात उंच झाली पाहिजे अशा वयात मी काय करतोय? मी खरच आई – बाबांचा मुलगा म्हणवून घेण्यास लायक आहे का? इंजिनीअर ही पदवी लाऊन घेण्यास पात्र आहे का? मी जगण्यास खरच योग्य असा मनुष्य प्राणी आहे काय? की मी नुसताच भूमीला भार म्हणून जगतो आहे? असे विचार रोज रात्री

त्याच्या मनात गर्दी करायचे. मग त्या गर्दीत तो हरवून जायचा. त्या गर्दीत त्याचा जीव गुदमरायचा. त्या सापसारख्या वळवळणाऱ्या गर्दीतून निघताना त्याचा जीव कासावीस व्हायचा. त्या काळ्या कभिन्न आठवणींच्या गर्गेतून बाहेर पडत असताना त्याला कोंबड्याची बांग ऐकू यायची. तेव्हा तो भानावर यायचा पण तोपर्यन्त तांबड फुटायला सुरुवात झालेली असायची. अशा कितीतरी रात्री पचवल्या होत्या.

आधीपासून शांत असणारा शुभम आता अधिकच शांत झाला होता. त्या समुद्रातील खोल पाण्यासारखा. ज्याच्यावर सूर्यप्रकाश पडत नाही. पण प्रवाळ देखील या पाण्यातच सापडते. दिवस उगवल्यापासून तो मोबाइलवर जॉब शोधत बसायचा. काही ओळखीच्या मित्रांना फोन करून त्यांच्या कंपनीत काही जागा वगैरे आहेत का? अशी विचारणा करायचा. याच कामात तो कासातरी दिवस घालवायचा. शेकडो ठिकाणी अर्ज केले, पण एकही ठिकाणाहून उत्तर येईल तर शपथ. अशा प्रकाराने तो अजूनच खंगत चालला होता. वरकरणी तो आनंदी असल्याचे भासवायचा. पण आतून तो खूप खिन्न असायचा.

त्याला पुस्तकं वाचण्याची आवड होती. गावातील काही मंडळींकडून पुस्तके आणून वाचायचा. त्यात त्याचे

थोडेफार मन रमायचे. त्याने कर्ण वाचला, तो स्वतःची तुलना त्या अभागी कौंतेयाशी करू लागला. हिटलर वाचला तो पण त्याला समदुःखी वाटू लागला. संभाजी वाचला, पानीपत वाचलं. या सर्वांत तो स्वतःला शोधू लागला. पण पुस्तक बंद केल्यावर परत त्याच्यावर झालेल्या अन्यायाने आणि आता असणाऱ्या परिस्थितीने त्याचे मन परत दुःखी व्हायचे. शेवटी त्याने पुस्तक वाचणे देखील बंद करून टाकले. अजून त्याच्या गावात आणि पंचक्रोशीत काही कोरोनाने भेट दिली नव्हती. त्यामुळे शेतात जाण्याचे कारण सांगून थोडेफार बाहेर जाता यायचे. मग हा त्याच्या बालमित्रांकडे जायचा. हे मित्र आता शेतीच्या कामात तरबेज झालेले आणि त्यांचा हा एकच मित्र इंजिनीअर असल्यामुळे एकूणच मित्रमंडळीत मजा घेण्यासाठी हक्काचा एकमेव माणूस शुभमच. यामुळे ते बोलताना थोडी मजामस्करी करत. तुझे काय बुवा, तू कंपनीत आहेस, लॉकडाऊन संपल्यावर परत सावलीत कामाला जाशील आणि आम्ही जाऊ शेतात. या मंडळींनी असे म्हणताच, याच्या तळपायाची आग मस्तकात जायची. ज्याच्यापासून दूर व्हयायला आपण इथे आलो, तेच आपल्या पाठीमागे धावत आले, असा विचार करून तो खिन्नपणे बसून राही. काही दिवसांनी शुभमने या मित्रांमध्ये बसणे देखील सोडले. मग तो नदीकिनारी जाऊ लागला. तिथेच त्या भयाण संध्याकाळी

नदीच्या वहात्या पाण्याबरोबर विसर्जित करू लागला. साक्षीला दगडगोटे, रानातील झाडं – झुडूपं असायचीच. संध्याकाळ मात्र भयानक. अतिशय भयाण. धड सूर्याचा प्रकाश न चंद्राचा. सावलीपण नाही. हवा नाही. तिकडे सूर्य कलतीला आणि चंद्र उगवतीला. वर्षानुवर्षे हेच कालचक्र अखंडपणे सुरू. संध्याकाळी रम्य असतात असे ऐकले होते, असतीलही. पण याच्यासाठी नाही कारण, गेल्या दोन वर्षांत याने संध्याकाळ पाहिलीच नव्हती. तेव्हा तो एकतर कंपनीत असायचा नाहीतर माणसांनी खचाखच भरलेल्या एखाद्या वाहनात. आता सायंकाळ अनुभवण्याचा योग आला होता तर तो असा होता.

इकडे जगात कोरोना ने कहर माजवला होता. लॉकडाउन दिवसेंदिवस वाढत होते, सोबतच याच्या मनाची घालमेलही वाढवत होते. येणारा प्रत्येक दिवस काळजी वाढवत होता. पण शुभम चेहऱ्यावर काहीच दिसू देत नव्हता. तो हसत होता, पण मनातून रडत होता. नशिबाला आणि प्रारब्धाला दोष देत. तो जेवत होता, पण दुःख पचवत होता. तो रात्री डोळे उघडे ठेऊनच झोपत होता. तो आता मायामोहाच्या प्रलोभनांपासून हळुवारपणे दूर लोटला जात होता.

शुभमला या काळ होऊन बरसणाऱ्या पावसात उभे राहून बराच वेळ झाला होता. तो विचारच करत होता. पाऊस

काही थांबत नव्हता, नखशिखांत चिंब भिजलेल्या शुभमच्या डोळ्यातून देखील असाच पाऊस सुरू झाला होता.....

†††

# दुर्मिळ प्रेतयात्रा

"आला कारे मेल?"

"नाही अजून."

"आणि काही टेंशन नको घेऊस. निगेटिव्ह येईल."

"मी नाही घेत रे टेंशन, मी तरुण आहे. मला नाही काही होणार."

"मग कशाचा विचार करतोयस मघापासून?"

"काही नाही, बाबांचा रिपोर्ट निगेटिव्ह आला म्हणजे झालं. त्यांचंच टेंशन आहे."

"नको काळजी करू, होईल सर्व ठीक."

"पण मी काय म्हणतो, काही गरज नव्हती ना बाहेर जायची. त्या फळ विक्रेत्याकडे किती लोकं येत असतील दिवसभरातून. मी बघितले आहे त्याला. तसाच बसलेला असतो लोटगाडीवर. विनामास्कचा, सॅनीटायझर तर हा प्रकार काय आहे हे त्याला ठाऊक आहे की नाही काय माहीत. इतके निष्काळजी कसे होऊ शकतात लोकं. लॉकडाउनचे फक्त नियम शिथिल केले आहेत. तरी असे वागतात, लॉकडाउन संपल्यावर कसे वागतात काय माहीत. तरी मी घरात संगितले होते, काही

आणायचे असल्यास मला संगत जा. पण आमचे ऐकते कोण? काही महीने फळं वगैरे नाही खाल्ली तर नाही चालत का?"

"ठीक आहे रे, तू उगाच चिडू नकोस."

"चिडू नकोस काय म्हणतोस कुत्र्या मला, घातला ना जीव धोक्यात. तीन दिवसांपूर्वी बाबा मार्केटला गेले. रात्री उशिरा त्यांना थोडा ताप आल्यासारखे वाटू लागले. घरातील गोळ्या – औषधींनी ती रात्र काढली. सकाळी डॉक्टरांकडे घेऊन गेलो. उगाच रिस्क नको म्हणून. डॉक्टरने देखील संगितले की काही काळजी करू नका म्हणून. इथपर्यंत सर्व ठीक होते."

"मग कुठे बिघडले?"

"सांगतो ना, ज्या डॉक्टरकडे गेलो होतो, तो सहकुटुंब कोरोना बाधित असल्याचे ऐकले आणि काळजाचा ठोका चुकला माझ्या."

"ऐकिव माहितीवर नको विश्वास ठेवत जाऊस."

"अरे बाबा, तो संपूर्ण एरिया सील केला. पालिकेने तीन वेळा पंपाने सॅनीटायझर फवारले. बाजूच्या काकांनी साक्षात डॉक्टरला फोन लावून खात्री करून घेतली. मग मी आणि बाबा लगेचच टेस्ट करण्यासाठी म्हणून गेलो. आमचे नशीब बलवत्तर

म्हणून किट उपलब्ध होते. नाहीतर टेस्टिंग उद्यावर ढकलली गेली असती.”

“हे मात्र बरं झालं.”

“हो, आता तेच रिपोर्ट येण्याची वाट बघतोय. आजचा तिसरा दिवस आहे. आतापर्यंत यायला हवे होते.”

“येतील आणि निगेटिव्ह येतील. नाकी काळजी करूस. बरं मी ठेऊ का फोन? बराच वेळ झाला, जेवणासाठी खोळंबलेत सगळेजण.”

“ठीक, बोलूया आपण.”

जरा वेळ अवीशी बोलल्यावर बरे वाटले. आता तो एकच तर हक्काचा मित्र उरला होता. त्याच्याशी बोलल्यावर कसं हलकं वाटलं. तीन दिवसांपासून माझी अवस्था अगदी वाईट झाली होती. एवढी काळजी घेऊन सुद्धा आमच्यावर टेस्ट करण्याची पाळी येईल असे वाटले नव्हते. फळ खरेदीचे निमित्त झाले होते. घरात दिवसासुद्धा नीरव शांतता होती. आई-बाबा चेहऱ्यावरील चिंता लपवण्याचा वायफळ प्रयत्न करत होते. पण प्रत्येकवेळी तो प्रयत्न निष्फळ होत होता. घरातील वातावरण चांगले करण्याचा आई वेळोवेळी प्रयत्न करत होती, पण काही वेळाने ती देखील उदास होत होती. बाबांना

रक्तदाबचा त्रास होता, त्यामुळे चिंता वाटणे साहजिकच होते. बाबांनी तर स्वतःला बेडरूम मध्ये सेल्फ क्वारांटाईन करून घेतले होते. मी बेडरूमच्या बंद दरवाज्यासमोर ठेवलेला जेवणाचा ताट देखील ते अर्ध्या तासाने ते उचलत. ते पाहून आमचा जीव पाणी पाणी होत होता.

सकाळपासून मी मेल चेक करत होतो. पण रिपोर्ट्स काही आले नव्हते. अस्वस्थता क्षणाक्षणाला वाढत होती. दुपार झाली तसा माझा थोडा डोळा लागला. पंधराएक मिनिटं झाले असतील तोच मोबाइलवर मेसेज टोन ऐकू आली आणि काळजात धस्स झाले. मी पटकन मोबाइल हातात घेतला. सकाळपासून ज्याची चातकासारखी वाट पाहत होतो, तो मेल आला होता. मी श्वास रोखून मेल ओपन केला. त्यात दोन फाइल्स होत्या, त्या डाउनलोड केल्या. आधी बाबांचा रिपोर्ट उघडला. तो पॉसिटीव्ह होता. काळजवर दगड ठेऊन मी माझा रिपोर्ट उघडला. तोसुद्धा पॉसिटीव्ह होता. मी मट्कन खाली बसलो. अंगातले सगळे त्राण नाहीसे झाले. समोरील सारे जग माझ्याभोवती फिरू लागले. मला अशा अवस्थेत बघताच आई आली. ती मला हात लावून विचारणार तोच मी किंचाळलो, “आई, दूर हो. मला कोरोना झालाय. मला हात लावू नकोस.”

माझे हे ओरडणे ऐकून बाबांनी रूमचा दरवाजा उघडला. मला अतिशय हताश झालेल्या अवस्थेत खाली बसलेला बघून ते समजायचे ते समजले. बाबा रूमच्या बाहेर पाऊल टाकणार तोच मी परत किंचाळलो,

“थांबा तिथेच, तुम्हीपण पॉसिटीव्ह आहात.”

माझे हे काट्यासारखे बोचणारे शब्द ऐकून बाबा जागच्या जागी थबकले. आई हताश होऊन आळीपाळीने आमच्याकडे पाहू लागली. मला तर काय करावे हेच समजत नव्हते. आता धीर देणारा मीच होतो.

“मी फोन करतो हॉस्पिटलला, काळजी नका करू. आम्ही दोघेही बरे होऊ आई. तू चिंता नको करूस. काहीही होणार नाही. कदाचित तुला देखील काही दिवस क्वारांटाईन करून ठेवतील. तू सोबत पुस्तकं घेऊन जा वाचायला.”

“पण तुम्ही दोघं तिकडे मरणाशी झुंज देत असताना माझे पुस्तकात मन रमेल का?”

मग काही वेळ आम्ही तिघेही शांत आणि सुन्न होऊन बसलो होतो. सुमारे अर्ध्या तासाने दारावरची बेल वाजली तेव्हा आम्ही भानावर आलो. दार उघडले तेव्हा समोर शासकीय रुग्णालयातले कर्मचारी होते. मला आलेले रिपोर्ट्स त्यांना

देखील पाठवण्यात आलेले होते. बाहेर एक पोलिस गाडी आणि अग्निशामक दलाची मोठी गाडी होती. कर्मचारी पिपीई किट घालूनच आले होते. त्यांनी आमचे रिपोर्ट्स दाखवले आणि ते योग्य ठिकाणी, योग्य व्यक्तींकडे आले असल्याची खातरजमा करून घेतली. सोबत आम्हाला काहीच होणार नाही, आपण मिळून या महामारीला तोंड देऊ असे आश्वासित केले. आम्हाला थोडा धीर आला. आईला देखील ते क्वारांटाईन करणार होते आणि आम्हाला शासकीय रुग्णालयात घेऊन जाणार होते. आता मी कोणत्याही परिस्थितीला सामोरे जयला तयार होतो. कारण साक्षात मृत्यू समोर ठाकला होता.

रुग्णवाहिका तयारच होती. आम्ही खिन्न मनाने घराबाहेर पडलो. आजूबाजूचे सर्व लोकं आम्हाला एका वेगळ्या नजरेने बघत होते. या नजरेत सहानुभूती मुळीच नव्हती. एक वेगळीच भावना होती. तिरस्काराची आणि हिनतेची. आज आमच्यावर एवढे संकट आले होते तेव्हा धीर देणारे दोन शब्द कुणीच बोलले नाही. सगळेजण मूग गिळल्यासारखे गप्प होते. बोलणं नाही निदान तशी आत्मविश्वास, धीर, प्रेम देणारी नजर देखील नव्हती. यांच्या संकटाच्या वेळेस आम्ही मागचा पुढचा विचार न करताच मदत करायची आणि आमच्यावर संकट आले तेव्हा हे प्रेमाचे दोन

शब्द देखील बोलायला तयार नाहीत. चार लोकांचे हे आत्मविश्वासाने भरलेले शब्द मनाला कितीतरी ऊर्जा देत असतात. पण ठीक आहे, वेळ प्रत्येकावर येत असते. यांच्यावर असा प्रसंग येणार नाही हे कुणी संगितले होते. पण आज यांच्या वागण्यात जो उद्दामपणा होता तो खचितच चांगला नव्हता आणि याची फार मोठी किंमत यांना चुकवावी लागणार होती.

यथावकाश आम्ही रुग्णालयात आलो. आम्हाला आमचे बेड्स दाखवण्यात आले. बाबा दुसऱ्या वार्ड मध्ये होते. हे रुग्णालाय म्हणजे अतिशय शासकीय होते. सकारात्मक ऊर्जेचा कुठेच लवलेश नव्हता. एखादा सामान्य आजार झाल्यासारखं इथले कर्मचारी वागत होते. त्यांनादेखील काय देणेघेणे होते म्हणा. पगार सुरू आहे ना, मग झालं. दिवस भरायचा आणि घरी जायच. इतकंच ते आतापर्यंत करत आले होते आणि पुढेही असच करणार होते. माझ्या आजूबाजूला जवळपास माझ्याच वयाचे समदुःखी रुग्ण होते. काही जिवाची आशा धरून अद्याप आशा ठेऊन होते. काही प्रफुल्लित मनाने लढत होते. काही निर्विकारपणे जे होईल त्याला सामोरे जायला मनाची तयारी करत होते. या असल्या वातावरणात राहण्यापेक्षा मी घरीच सेल्फ क्वारांटाईन झालो असतो तर निदान बरा तरी झालो असतो, असे माझ्या मनात येऊ लागले. कारण इथली परिस्थिती एखाद्या रूग्णाला जगवण्यापेक्षा मारण्यासाठीच

पोषक होती असे म्हटल्यास त्यात नवल वाटण्याचे कारण नव्हते. आता आमच्यापैकी जे कुणी वाचणार होते, ते स्वतःच्या आत्मिक प्रेरणेने प्रेरित होऊन जगणार होते.

मी तसाच विचार करत बेडवर पडून होतो. सायंकाळची रात्र झाली तरी मी विचारांच्या गार्गेतून बाहेर आलो नव्हतो. शेवटी माझ्या बाजूच्याने मला हाक मारून भानावर आणले. जेवणाची वेळ झाली होती. जेवण वगैरे झाल्यावर आम्हाला काही औषधे दिली गेली. औषधे घेतल्यावर काही वेळातच झोप यायला लागली. पण एकदा बाबांना भेटून यावे या विचाराने मी रुग्णालयातल्या कर्मचाऱ्यांना बाबा कुठे आहेत असे विचारले. दोन वेळा विचारल्यावर त्यांनी एकदा तुटकपणे उत्तर दिले, “आम्हाला काय माहीत?”

मग माझा थोडासा पारा चढला. मी जोरात बोलायला लागणार तोच मला आजूबाजूच्यांनी हटकले आणि शांत बसवले. मी परत शांतपणे बेडवर पडून राहिलो. औषधांमुळे झोप प्रचंड प्रमाणात येत होती पण बाबांना बघण्याची अनिवार इच्छा होत होती. मग मी रात्री उशिरा बाबांना भेटला जाण्याचं निर्धार करून झोपलो.

रात्री उशिरा जाग आली तेव्हा दोन वाजले होते. माझ्या वार्ड मधील सर्वजण शांतपणे निद्राधीन झाले होते. तो शासकीय

कर्मचारी पेंगत होता. मी त्याच्यासमोरून वार्ड बाहेर पडलो तरी त्याला शुद्ध नव्हती. मी समोरच असणाऱ्या बाबांच्या वार्डसमोर येताच मला तिथल्या कर्मचाऱ्याने हटकले. मी त्याच्या बऱ्याच विनवण्या केल्यावर तो मला आत सोडण्यास तयार झाला. मी एक एक बेड शाधात बाबांच्या बेडजवळ आलो. बाबदेखील इतक्या रात्री जागे होते. मी त्यांच्या बेड जवळ गेलो तसे ते म्हणाले, “तू इकडे कसा? इतक्या रात्री?”

“होय बाबा, भेटायला आलो. कसं वाटते आता?”

“मी ठीक आहे. घशात थोडा त्रास होतोय. बस्स एवढचं. तू झोपला नाहीस अजून? तुला कसं वाटतय?”

“मी बरा आहे. सहजच भेटायला आलो होतो.”

“आईचा काही फोन वगैरे?”

“नाही, मी सकाळी करणार आहे. तुम्हीपण करा.”

“हो, करेन मीपण. तू जा आता बराच वेळ झाला. कुणाला समजलं तर आरोळ्या मारतील.”

“ठीक आहे. मी तुमच्या बाजूच्याच वार्डात आहे. काही त्रास वगैरे झाला तर सांगा आणि काळजी घ्या.”

मला उगाचच त्यांचे पाया पडावेसे वाटले. मी त्यांच्या पायाला हात लवताच त्यांना गहिवरून आले. मग मी काही न बोलताच खिन्न मनाने तिथून बाहेर पडलो. माझ्या जागेवर आलो आणि झोपण्याचा वायफळ प्रयत्न करू लागलो. आज कोरोनामुळे आमचे कुटुंब एका वेगळ्याच परिस्थितीला तोंड देत होते. एकदम वेगळ्या. असा आजार ज्याच्यावर काही उपचार नाहीत. जो एकदम जीवघेणा आहे. असे विचार करत असतानाचं पहाटे केव्हातरी मला झोप लागली.

सकाळी जाग आली तेव्हा बराच उशीर झाला होता. अविचे दोन कॉल्स सकाळी सात वाजताच येऊन गेले होते. मी या गडबडीत त्याला झालेला प्रकार कळवलाच नव्हता. त्यालादेखील खूप वाईट वाटले. तो लगेचच भेटायला येण्यासाठी निघत होता. पण मी त्याला आईला भेटून मग शक्य असल्यास इकडे यायला लावले. कारण आधार देणारा तो एकटाच होता.

दुपारी जेवताना कळले की, बाबांच्या वार्ड मधील दोन गृहस्थांचा कोरोनामुळे मृत्यू झाला. त्यांचे शव शवागरात ठेवले होते. त्यांचा अंत्यविधी करायला देखील कुणीच नव्हते. कारण दोघांच्या घरातील सर्व जण क्वारांटाईन केले होते. मला त्यांच्याविषयी खूप वाईट वाटत होते. अंत्यविधी करण्यासाठी

देखील कुणीच नसणे म्हणजे किती शोकांतीका होती. मग सायंकाळच्या सुमारास अविचा फोन आला. त्याला येण्याचे शक्य नसल्याचे तो म्हणाला. रुग्णालयाच्या प्रवेशद्वारावरच त्याला अडवले आणि मग नाइलाजाने तो परत निघून गेला होता. तो आईला पण दुरूनच भेटून आला होता. आई बरी होती, चांगली बोलली, असे तो म्हणाला तेव्हा माझ्या जीवात जीव आला. माझी तर आईला फोन लावण्याची हिंमतच होत नव्हती, काय बोलणार होतो मी आईशी? ही बातमी बाबांना सांगायला हवी असे मला वाटले. मग मी एका कर्मचाऱ्याच्या परत विनवण्या करून बाबांना भेटला जायचे असे संगितले. तशी त्याने मला मनाई केली. मी मन खट्टू बसलो. बाबांना फोन लावण्याचा प्रयत्न केला तर तो स्विच ऑफ येत होता. चार्जिंग करायला विसरले असतील बहुतेक म्हणून मी फोन लावणे बंद केले.

आज रात्रीचा बाबांना भेटायला जाण्याचा बेत फसला होता. त्यामुळे मी नाइलाजाने बेडवर पडून होतो. कालचा बाबांचा तो चेहरा माझ्या डोळ्यांसमोरून जात नव्हता. ते चक्क रडत होते. मला देखील रडू येत होते. पण त्यांच्यासमोर कसं रडणार. अविने जरी संगितले होते तरी आईची अवस्था देखील आमच्यापेक्षा काही वेगळी नसणार हे मी मनोमन जाणून होतो. बाबा संगत नव्हते, पण त्यांना किती त्रास होत होता हे काल

त्यांच्या डोळ्यांतून मी बघितले होते. माझ्या मनात अशुभ विचार येऊ लागले. मी झोपण्याचा प्रयत्न करू लागलो. पण येतच नव्हती. कारण या रात्री फक्त रात्री नव्हत्या. प्रत्येक रात्र ही वैऱ्याची होती. काळ बनून प्रत्येक रात्र समोर येत होती. यमदूत तर अदृश्यपणे बेभान होऊन सभोवताली पिंगा घालत होते. जो खचत होता, त्याला यमदूत दिसत होता आणि दोघांची नजरानजर होताच यमदूत त्याला कळण्याच्या आत काळाच्या पडद्याआड ओढत होता. मग ती व्यक्ती नावाने आणि कर्तुत्वाने जगात राहत होती फक्त.

बाहेर कुत्र्यांच्या भांडणाने जोर धरला होता. हळूहळू त्यांचे भांडण बंद झाले आणि दीर्घ स्वरातील भेसूर रडणे सुरू झाले तेव्हा मनात एक वेगळी भीती घर करून बसली. इकडे औषधांचा प्रभाव शरीराने स्वीकारायला सुरुवात केली होती आणि मला थोडी झोप लागत होती.

मी बाहेर त्या कुत्र्यांचे रडणे बंद करायला जातो. त्यांना दगड मारणार तोच मागून एक अजस्त्र कुत्रा येऊन माझ्या हातचे तुकडे पडतो. मला असह्य वेदना होतात. मी माझाच हात खाली जमिनीवर पडलेला पाहतो आणि घाबरून जोरात परत रुग्णालयाकडे पळत सुटलो. इतक्यात डोळ्यांसमोर लक्ख प्रकाश पडला आणि डोळे उघडले तर मी बेडवरच होतो आणि

माझा हात देखील शाबूत होता. मी घाबरून उठून बसलो. ते स्वप्न होते तर.

या वेळी बाबांना बघण्याची अनिवार इच्छा झाली म्हणून तसाच उठलो आणि दुसऱ्या वार्डकडे गेलो. सुमारे साडेचार होत होते. तिथे अडवणारं कुणी नव्हतं म्हणून बरं झालं. मी पटकन मध्ये घुसलो आणि बाबांचा बेड जवळ आलो. तिथे बाबा नव्हते, कदाचित वॉशरूमला गेले असतील म्हणून थोडा वेळ थांबलो. अर्धा तास झाला तरी बाबा आले नाहीत म्हणून मीच वॉशरूम कडे गेलो. तिथे कुणीच नव्हते. मग कदाचित रस्त्यात चुकामुक झाली असेल म्हणून परत जागेवर आलो, पण तिथेही बाबा नव्हते. माझ्या मनात शंकेची पाल चुकचुकली.

मी धावतच रिसेप्शनकडे गेलो. तिथे कुणीच नव्हते. मग पळत पळत कुणी कर्मचारी दिसतो का हे बघू लागलो. शेवटी एक सापडला. तो कोण, काय करतो हे न विचारताच मी त्याला माझ्या बाबांविषयी विचारले. तो अजून झोपेतच होता. माझा आवाज वाढताच तो शुद्धीत आला आणि मला वार्डकडे घेऊन गेला. मला त्याने बाबांचे नाव विचारले आणि ते ऐकताच तो गंभीर झाला. त्याने मला त्याच्या मागून यायला लावले तसा मी त्याच्या मागून जाऊ लागलो. बरेच अंतर कापल्यावर आम्ही

ज्या जागेसमोर आलो तिचे नाव वाचताच मला दरदरून घाम आला. ते शवागर होते. त्याने ते दालन उघडले आणि आम्ही सोबतच आत गेलो.

एका शवपेटीकेसमोर त्याने मला उभे केले आणि जरा मागे जाऊन उभा राहिला. मी काय समजायचे ते समजलो. त्या पेटीत माझ्या बाबांचे प्रेत होते.

काळजावर दगड ठेऊन मी पांढरा कापड ओढला. समोर बाबा शांतपणे झोपले होते. अगदी शांत आणि निर्विकार. त्यांना आता काहीच होणार नव्हते. कुठलाच जीवघेणा रोग आता त्यांना हात लावू शकणार नव्हता. कारण कोरोनाने त्यांना आपल्या मागरमिठीत घेतले होते. मी एकसारखा बघतच होतो, कर्मचाऱ्याने दोन-तीन वेळा जोरात हाक मारताच भानावर आलो.

"तुम्ही कोण यांचे?"

"मुलगा."

"अरे रे, वाईट झाले. आता लवकरात लवकर पुढील प्रक्रिया सुरू कारला हवी. या बाबांसाठी तरी तुम्ही आहात, बाकीच्या प्रेतांना तर कुणीच वाली नाही."

"ते जाऊ द्या. मला सांगा काय करायचे आहे?"

“तुम्ही डॉक्टरांना भेटा.”

“त्यांना बोलव इथे. मी शोधत नाही बसणार. मला शेवटचं एकदा बसू दे बाबांजवळ.”

“ठीक आहे, मी सांगतो.”

मी शवागरात तसाच बसून होतो. एक जीवंत शव होऊन. कदाचित त्यांच्यासारखेच होण्यासाठी. कायमच्या शांत झालेल्या बाबांशी मी बोलण्याचा प्रयत्न करत होतो. आता आईला काय सांगू असे मनोमन विचारत होतो. काही वेळाने डॉक्टर आले. त्यांनी खेद व्यक्त केला.

“केव्हा झालं?”

“काल सायंकाळी. माफ करा, आम्हाला माहिती नव्हते तुम्हीपण इथे आहात.”

“काय फरक पडतो आता. मी खिन्नपणे म्हणालो.”

“माझ्या आईला दुरूनच अंत्यसंस्कार बघण्यासाठी बोलावू शकतो का?”

“नाही, आम्हाला खरंच माफ करा. पण नियमांचे उल्लंघन आम्हाला नाही करता येणार आणि तुम्हीदेखील करू नका. सहकार्य करा, प्लीज.”

काही ठिकाणी मला स्वाक्षऱ्या करायला लावल्या आणि पुढील संस्कारांसाठी प्रेत माझ्या हवाली केले. ते आल्या पावली निघून गेले. मी मात्र तिथे एकटाच होतो. मघाचा तो कर्मचारी आणि डॉक्टर निघून गेले होते. आता मात्र मी खरोखरच एकटा होतो. माझ्या डोळ्यासमोर आईचे पांढरे कपाळ येऊ लागले. शेवटी कासातरी उठलो आणि रुग्णवाहिकेची व्यवस्था लावण्यासाठी बघू लागलो. देवाने सारी सोय आधीच लावून ठेवली होती. स्मशानभूमी देखील पायी पंधरा मिनिटांच्या अंतरावर होती. म्हणजे हे सगळे आधीच ठरले होते तर. जवळच स्मशानभूमी, रात्री त्या कुत्र्यांचे भेसूर रडणे, स्वप्नात माझाच हात तुटलेला पहाणे, हे सर्व या घटनेचे सूचकच नव्हते काय? पण आता वेळ निघून गेली होती. ती थांबवता येणे कुणालाही शक्य होते काय?

रुग्णवाहिकेसाठी मी प्रत्येकाला विचारत होतो. कुणीच धड सांगत नव्हते. बाहेर आवारात रुग्णवाहिकेजवळ एक व्यक्ति बसलेली दिसली. त्याला मी विचारले असता तो रुग्णवाहिकेचा वाहक असल्याचे समजले. मी त्याला स्मशानभूमी पर्यन्त घेऊन चालण्याची विनंती केली. त्याने अगदी उर्मटपणे मला नकार दिला. आता मात्र माझ्या संयमाचा बांध फुटला आणू मी त्याच्यावर धावून गेलो.

“अरे भोXXX, पगार कसला घेतोस मग? त्यालाही असाच नाही म्हणत जा ना. सकाळपासून फिरतो आहे. माझे बाबा वारले आहेत. तुला माहिती आहे का मादरXX. फक्त स्मशानापर्यन्त घेऊन जायला लावतो आहे. स्वर्गात नाही.”

“ए, सोड मला. मी सरकारी कर्मचारी आहे. हात लावायचं काम नाही आणि अजून जर शिव्या दिल्या ना तर विचार करून ठेव.”

“माज आला काय रे भडव्या तुला सरकारी नोकरीचा. गेलास उडत. ठीक आहे. मी समर्थ आहे. गांXX घाल तुझी सरकारी नोकरी. असाच मरशील एक दिवस. गरज नाही मला कुणाची.”

मी तडक शवागराकडे गेलो. बाबांचे प्रेत ताब्यात घेतले तिथे जवळच स्ट्रेचर ट्रॉली पडली होते. शवपेटीकेतून एकच्या मदतीने प्रेत ट्रॉलीवर ठेवले आणि ट्रॉली लोटत-लोटत रुग्णालयाच्या बाहेर आलो. बाहेर आल्यावर त्या रुग्णालयाच्या नारकसामान इमारतीकडे आग ओकणाऱ्या डोळ्यांनी पाहू लागलो. माझ्या त्या नजरेत कितीतरी संताप होता. स्मशानभूमीचा रास्ता धरला आणि चालू लागलो. किती दुर्दैवी होते बाबा. त्यांना खांदा द्यायला देखील कुणी नव्हते. तिकडे दिवस उजाडला होता आणि बाबांचा दिवस

आयुष्याच्या रम्य सायंकाळी संपला होता. कायमचा. सत्य हे कल्पनेपेक्षा भयंकर असते असे म्हणतात, मला त्याचा आज याची देही याची डोळा प्रत्यय येत होता.  रस्त्यावरील लोकं मला बघत होते. काही हळहळत होते. काहींना खरंच वाईट वाटत होते. काही मनोरंजन म्हणून पहात होते. मला कुणाशीच काहीच देणेघेणे नव्हते. हे निर्दयी, क्रूर, फसवे, खोटे जग आता माझे शत्रू झाले होते.

मी माझ्याच वेगळ्या जगात होतो. एकटाच. काही दिवसांपूर्वी आम्ही तिघे होतो आमच्या कुटुंबात. पण आता, आता तर आई आणि मीच उरलो होतो. असाच बेभान विचार करत करत स्मशानभूमीत पोहोचलो. मग एका दगडाची ठेच लागताच भानावर आलो. पुढे काय करायचे याचा विचार करत असतानाच मागून कुणीतरी येण्याचा भास झाला. मागे वळून बघितले असता अवि अतिशय पाडलेल्या चेहऱ्याने येत होता.

"मी रुग्णालयातून आलो. तिथेच समजले."

मी खिन्नपणे हसलो. मी काहीच बोलत नाही हे पाहून तो परत म्हणाला, बघ, कुणी कसेही वागले तरी मी तुझ्यासोबत आहे. मी सदैव तुझ्या सोबत आहे.

"सोबत आहेस ना. चल, बाबांची चिता रचू लाग."

तो स्मशानभूमीच्या बाहेरच खाली मान घालून उभा राहिला. मी समजायचे ते समजलो. आताच सोबत असणारा अवि बाहेरच उभा होता. मी कोरोनाग्रस्त होतो ना.

मी निमूटपणे चिता रचू लागलो. तिथे एक लहानसा मुलगा होता. त्याने बाकीची व्यवस्था करून ठेवली. मग आम्ही बाबांना ट्रॉलीवरुन उचलून चितेवर ठेवले. मी शेवटचं बाबांना डोळेभरुन बघितलं. अविने नजरेनेच मला धीर दिला.

मुखाग्नि देण्यासाठी मी वळलो. एकदा अविला विचारले, “आईला घेऊन येतोस का? तसा तो रडायला लागला.”

“समजून घे मित्रा. नाही आणता येणार. तिला जिवंत पहायचे आहे ना. मग हे अग्निदिव्य करावेच लागेल. शूर हो.”

आता वेळ दडवण्यात काहीच अर्थ नव्हता. आपण फक्त विधात्याच्या हाततल्या कळसूत्री बाहुल्या आहोत हे मला पुरेपूर उमगले होते. तो नाचवतो तसे नाचायचे, त्याच्या इच्छेप्रमाणे हसायचे, रडायचे आणि मरायचे सुद्धा. शांतपणे चिरनिद्रा घेत असलेल्या बाबांकडे एकदा पहिलं आणि मुखाग्नि दिला.

त्या सुकलेल्या लाकडांच्या चितेने लगेच पेट घेतला. आतापर्यंत थांबवून धरलेल्या अश्रूंना मी वाट मोकळी करून दिली. जोरात आक्रंदून रडू लागलो. त्या अश्रूंवाटे बाबांसोबतच्या आठवणी गालावरून ओघळू लागल्या. माझ्याकडे बघून अविदेखील रडू लागला. त्या स्मशानभूमीत आम्ही तिघेच होतो. जळणाऱ्या चितेचा प्रत्येक कण क्षणाक्षणाला बाबांचे उरलेसुरले अस्तित्व नष्ट करत होता. भौतिकदृष्ट्या. आठवणरूपी तर ते कायमच स्मृतीत असणार होते. कपाळमोक्ष झाला आणि आम्ही दोघे रुग्णालयात निघालो. आता तिथे धगधगता विस्तव होता. एका माणसाचा जो कोरोनामुळे अनंतात विलीन झाला होता...

†††

# क्वारंटईन सॉफ्टवेअर इंजिनीअर

“रामराव, आहात का घरात?” पाटलांनी दारावर थाप मारत जोरात आरोळी मारली.

“या... या पाटील. काय म्हणतात, आज सकाळीच चरणकमल आमच्या घराला लावलेत. काय विशेष?” रमराव दार उघडत म्हणाले.

“तुमचे कुलदीपक आले म्हणे पहाटे, त्यांनाच घ्यायला आलोय.” पाटील मिशीला ताव देत म्हणाले.

पाटलांचे हे बोलणे ऐकून रामरावांचा चेहरा चिंताग्रस्त झाला. रामराव पाटील, गावातील एक उमदा शेतकरी माणूस. स्वभावाने चांगला. सुयोग, रामरावांचा एकुलता एक मुलगा. सॉफ्टवेअर इंजिनीअर. नोकरीला अर्थातच पुण्याला. उच्चशिक्षण देखील पुण्यालाच. त्यामुळे गावाशी फारसा संबंध नाहीच. काल रात्री दुचाकीवर मित्रासोबत घरी येण्यासाठी निघाला. तसं गाव त्याला आवडायचं नाही. पण आता गावी जाणं म्हणजे काळाची गरज होती. सर्वत्र कडक लॉकडाउन सुरू होते. पुण्यात कोरोना दिवसागणिक हातपाय पसरत होता. त्यामुळे प्रॉपर पुण्यातली सोडली तर, पोट भरण्यसाठी आणि गावाकडे कंपनी वा उद्योगधंदे नाहीत म्हणून पुणायला

स्थलांतरित झालेली असंख्य मंडळी गावी परतत होती. आकाशमंडळात भास्कर असे पर्यन्त पोलिसांची करडी नजर चुकवून जाणे मुंगीलासुद्धा अशक्य होते. कुणी दिसताच त्याला चौदावे रत्न दाखवण्यात यायचे. दिवसाढवळ्या डोळ्यासमोर काजवे चमके पर्यन्त. पण रात्री काहीही कारण सांगून सटकता येणे शक्य असल्याने सुयोग रात्रीच निघाला. लॉकडाउन असल्याने रस्त्यावर एक हॉटेल उघडे असेल तर शपथ. त्यामुळे प्रवासात कुठेही चहा वगैरे घेताच आला नाही. पहाटे पाचच्या सुमारास सुयोग घरी आला. इतक्या सकाळी देखील तो नदीवर तुळस लावून येत असलेल्या रम्याच्या नजरेला पडला आणि रम्या तिकडेच पाटलाकडे गेला.

गावात कोरोनाचा फैलाव होऊ नये, यासाठी पाटील, सरपंच वगैरे मंडळींनी एकत्र येऊन गावात गावाबाहेरील व्यक्तींना प्रवेश निषिद्ध केला होता. त्यासाठी ते स्वतः पहारा देत होते. गावाच्या दोन्ही प्रवेशद्वारांवर आळीपाळीने ते ठाण मांडून होते. म्हणजे ते त्यांच्या मार्जिने तसं करत होते असे नाही, त्यांना सरकार कडून तशी सक्त ताकीद आली होती. नाहीतर पद जाणार होते. त्यामुळे हे सर्व करणे आगत्याचे होते.

“कुठे हरवलात रामराव?”

“काही नाही, अगं उठव त्याला.”

सुनिताबाईंनी दोनच तासांपूर्वी झोपलेल्या सुयोगला उठवले आणि पाटलांसमोर हजर केले.

“काय बाळ, कसा झाला प्रवास?” पाटलांनी आवाजात शक्य तितका मृदुपणा आणत म्हटले.

“ठीक झाला.” सुयोग जांभई आवरत म्हणाला.

“मग, आता आराम का?” पाटील.

“हो. रात्रभर गाडी चालवली हो. एक मिनिट सुद्धा झोपलो नाही.”

“बापरे, ते सर्व ठीक आहे, पण तुला क्वारांटाईन व्हावे लागेल.” पाटील थेट मुद्द्यावर आले.

“कुठे?” वक्राकार भुवया अजून ताणत सुयोग जवळपास किंचाळला.

“आपल्या शाळेत.” पाटील स्मितहास्य करत उद्गारले.

“त्या जिल्हा परिषदेच्या?”

“हो, त्याच. तिथे तुमची सर्व व्यवस्था केली आहे. खाणं – पिण – झोपण वगैरे एकदम मस्त.”

“मी घरी होतो ना त्यापेक्षा. मी रजा नाही टाकलीये मी घरूनच काम करणार आहे.”

“शाळेतून कर ना, कुणाला समजते?” पाटील डोळा मिचकवत म्हणाले.

“अहो पण....”

“बघा रामराव, तुम्ही सुशिक्षित आहात. आज तुम्हीच जर असे वागलात तर गावातील लोकांना कुणाचे उदाहरण देणार? ही काही सविनय कायदेभांगाची वेळ नव्हे. समजावा तुमच्या मुलाला. पुण्याहून आलाय म्हणून. जवळपासहून आला असता तर मी आलोदेखील नसतो. पण गावात कोरोनाची लागण झाली तर काय होईल आणि त्याला काही सीमेवर नाही पाठवत आहोत. चौदा दिवसांचा तर प्रश्न आहे. त्याला काहीही झाले नाही हे सर्वांना माहिती आहे पण सरकारी नियम पाळणे बंधनकारक आहे.” सुयोगला पुढचं काहीएक न बोलू देता पाटील रामरावांना जवळपास धमकावण्याच्या आवेशात म्हणाले.

“बरोबर आहे पाटील तुमचं. मी समजवतो त्याला. तुम्ही या. तो स्वतःच येईल शाळेत.”

“सुयोग बाळ, मी परत सांगण्याची गरज आहे का?”

“नाही बाबा, जातो मी.” सुयोग नाइलाजाने म्हणाला.

“छान, तू नको काळजी करूस, तो काही युद्धावर नाही चालला. गावातच आहे.” रामराव सुनीताबाईंना समजावत म्हणाले.

लॅपटॉप, मोबाइल या प्राथमिक जीवनावश्यक वस्तूंसोबतच इतर दुय्यम जीवनावश्यक वस्तू बॅगेत भरून सुयोगने प्रस्थान केले. शाळेच्या गेटवरच त्याच्या हातावर रीतसर क्वारांटाईन झाल्याचा शिक्का आशा सेविकांकडून मारून घेतला. त्याच्यावर काय लिहिले आहे हे बघत असतानाच त्याला आवाज आला. “मेरा बाप चोर है, असं लिहिल्यासारखा काय बघतोयस लेका.”

सुयोगने चमकून वर पहिले. तो विकास होता. सुयोगाचा बालपणीचा मित्र. “अरे विकास, इकडे कसा?”

“कसा म्हणजे काय? तू आलास तसा. चल मला सोबत झाली.” असे म्हणून तो खळखळून हसू लागला.

सर्व सोपस्कार यथास्थित पार पाडून सुयोग क्वारांटाईन झाला. दुसरीच्या वर्गात त्याची व्यवस्था होती. पहिलीच्या वर्गात पाच जण, दुसरीच्या वर्गात पाच असे सातवीच्या वर्गापर्यंत एकूण पस्तीस जण क्वारांटाईन झाले होते. आणि

तिथेच रहात होते. गुण्यागोविंदाने. ही सर्व मंडळी मागील एक दोन  दिवसांतच मंडळी इथे भर्ती झाली होती. सर्व मंडळी सुयोगच्या गावातील तथा शाळेत देखील एकदोन वर्ष मागेपुढे असल्याने सुयोग सर्वांना नावाने नाही पण चेहऱ्याने बऱ्यापैकी ओळखत होता. शाळेत असताना विकास त्याच्या वर्गात होता आणि आतदेखील तो त्याच वर्गात क्वारांटाईन झाला होता. निव्वळ विचित्र योगायोग.

सुयोग रात्रीच्या अविश्रांत प्रवासामुळे फार थकून गेला होता. त्यात अपूर्ण झोप. त्यामुळे त्याला झोपेची नितांत आवश्यकता होती. तो त्याचा दुसरीचा वर्ग न्याहाळू लागला. आठवणी पुसट होत्या, पण काहीतरी कुठेतरी घडल्यासारखं आठवत होतं. खाली सतरंज्या टाकल्या होत्या. हा शेवटी आला असल्याने जागा निवडण्याचा प्रश्नच नव्हता. जी सतरंजी रिकामी होती, तिच्यावर त्याने सामान टाकले. थोडी किळस येत होती, पण त्याला पर्याय नव्हता. कारण तो कधी खाली जमिनीवर झोपलाच नव्हता. वर कोळयांची जाळे, भिंतींचे पोपडे निघालेले, नावापुरता प्रकाश, स्वतःचेच घर असल्यासारख्या फिरणाऱ्या पाली, त्यांची सावज पकडण्यासाठीची धडपड हे सर्व पाहून त्याला किळस वाटणे साहजिकच होते. कशीतरी त्याने टेकवली आणि बॅगेतून पाण्याची बाटली काढत असतानाच विकास आला. सुयोगचा

चेहरा पाहून तो समजायचे ते समजला. मग त्याच्या जागेवर बसत म्हणाला, “सवय करा पाटील याची. आता सुटका नाही. तू झोप आता. थकला असशील.”

“हो, जेवायला उठव.” असे म्हणत सुयोग त्या सतरंजीवर आडवा झाला. त्या खोलीत त्याला कसेतरीच वाटत होते. पण काय करणार. त्याने फोन काढून बॉसला आज सुट्टीवर असल्याचा मेसेज केला आणि फोन स्विच ऑफ करून डोळे बंद केले. पडताच त्याला निद्रादेविने आपल्या ताब्यात घेतले. यथावकाश दुपारी बारा-साडेबाराच्या सुमारास त्याला विकासने माह्त्प्रयासाने उठवले. तो बाहेर शाळेच्या मैदानात आला तेव्हा मंडळी मोठे रिंगण करून बसली होती. ही दोघेपण त्यांच्यात सामील झाले. मग हातोहात केळीची पानं, पोळी, भजी स्वहस्ते वाढून घेण्यात आली आणि जेवण सुरू झालं. सुयोग अजूनही गुंगीतच होता आणि भूक देखील प्रचंड प्रमाणात लागलेली. त्यामुळे ते नावडते जेवण तो भुकेच्या सापट्यात फस्त करू लागला. जेवण वगैरे झाल्यावर तो परत झोपला तो सायंकाळच्या सुमारास उठला. त्याने फोन हातात घेतला आणि बॉसचे आलेले मिस्डकॉल आणि मेसेज पहात बसला. काहीतरी नवीन प्रोजेक्ट आला होता, त्या बाबतीत बॉसने त्याला अर्जंट फोन लावायला लावला होता. सुयोग त्या

आपत्तीचे चिंतन करत होता, तोच विकास आला,

“झाली का झोप?”

“झाली बाबा. फार थकलो होतो रे.”

“बरं ते जाऊ दे, चला खिचडी बनवायला.”

“आता? आणि मला काहीच नाही बनवता येत.”

चल रे, आता पुण्यात नाहीस तू. असे म्हणत विकास सुयोगला जवळपास ढकलतच बाहेर मैदानात घेऊन आला. सर्व क्वारांटाईन मंडळींनी मिळून खिचडी केली आणि अगदी थोड्याच वेळात फस्त केली तेव्हा फक्त साडेसात वाजले होते. सुयोगने बॉसला फोन लावला. आधी बॉसचे बोलणे ऐकले आणि मग प्रोजेक्ट विषयी बोलला लागला. आज रात्री त्याला काम करण्यासाठी म्हणून बसावे लागणार होते. मंडळींची जेवणं झाल्यामुळे जवळपास सर्वजण आपापला मोबाइल चेक करण्यात व्यस्त होते. सुयोगने देखील लॅपटॉप काढले आणि चार्जिंग पॉइंट शोधू लागला. जिल्हा परिषदेची शाळा ती, तिथे कशाचा चार्जिंग पॉइंट आणि काय. ऑफिस मध्ये एक ईलेक्ट्रिक बोर्ड होते. तिथे सुयोगची सोय झाली. तो मोठ्या उत्साहात काम करायला बसला पण थोडेदेखील नेटवर्क असेल तर शपथ. मोबाइल बाहेर ठेवायचा हा एक पर्याय होता, पण मैदनवर मोबाइल ठेवला आणि चोरीला गेला तर. असे वाटून

त्याने काहीतरी दूसरा मार्ग मिळतो का असा विचार करायला सुरुवात केली. त्याने बाहेर बघितले, मंडळी मैदानात झोपण्याची सोय करत होती. त्याने विचारल्यावर समजले की, सर्वजण रात्री बाहेरच झोपतात कारण उन्हाळा प्रचंड होता. त्याने विकासकडे मोबाइल दिला आणि काम सुरू करावे म्हणून ऑफिसमध्ये गेला. हे तेच ऑफिस होते जिथे जायला तो आधी खूप घाबरायचा. कारण तिथे हेडमास्तर असायचे. त्याला ते दिवस आठवले. तो स्वतःशीच हसला. लॅपटॉप सुरू केले आणि बघतो तर काय नेटवर्क नव्हतेच. सुयोग वैतागला. क्वारांटाईन मंडळीपैकी जवळपास सर्वांचे रोजचे नेट संपले होते.

मग शांतपणे लॅपटॉप बंद करून बागेत ठेवले आणि सतरंजी घेऊन मैदानात आला. विकासच्या बाजूला सतरंजी अंथरुन आडवा झाला. त्यांच्या बालपणीच्या गप्पा सुरू झाल्या मग. याच मैदानावर त्यांची सकाळी प्रार्थना व्हायची. डबे देखील ते इथेच खायचे. कितीतरी लहान वाटत होते ते मैदान आता. मैदान होते तसेच होते, मंडळी मोठी झाली होती. यांच्या गप्पा सुरू झाल्यावर बाकीचे दोन-चार जण यांना सामील झाले. मग काही वेळाने अजून पाच-सहा. असे करत करत सर्व जण बालपणींच्या आठवणींमध्ये रमून गेले. हास्याविनोद सुरू झाले. एकमेकांची टिंगल करणे सुरू झाले.

अगदी लहानपणी करायचे तसे. मोठे झाले म्हणून काय त्यांच्यातले लहान, खट्याळ मूल अजून जीवंत होते. किंबहुना ते निद्रिस्त झाले होते, त्याला जागवले होते ते या शाळेने, गावाने आणि सर्वांच्या सहवासाने. एकमेकांच्या विचारपूस सुरू झाल्या, विषय नागमोडी वळणे घेऊ लागले. तो आता काय करतो, ती कुठे आहे, याच्या लग्नाला काय मजा आली होती, त्या दिवशी अचानक ती भेटली होती. वगैरे, वगैरे. खेदाची गोष्ट म्हणजे सुयोगकुमार यांच्यात कुठेच नव्हता. तो फक्त ते क्षण मुकेपणाने ऐकत होता. बळेच हसत होता. त्यांच्यात सामील व्हायचा प्रयत्न करत होता. पण चोवीस तास कम्प्युटरची स्क्रीन बघणायची सवय असलेले त्याचे मन हा खऱ्याखुऱ्या माणसांमध्ये रामण्यास कुठेतरी आडकाठी लावत होते. बराच वेळ झाल्यावर गप्पा संपल्या. सर्व जण झोपले तरी हा जागाच. घुबडासारखा. मग तो मैदानात ऊगाचच फेऱ्या मारू लागला. हात मागे बांधून. दुरूनच कुत्र्यांचे भुंकणे ऐकू येत होते. हा मात्र फिरत होता. अस्वस्थपणे. या अस्वस्थतेचे कारण त्यालाच समजत नव्हते. कितीतरी दिवसांत नव्हे तर वर्षांत तो त्याच्या मित्रांमध्ये असा गप्पा मारायला बसला होता. नवीन प्रोजेक्ट डोक्यावर होता, नेटवर्कमूळे काम करता येणे केवळ अशक्य होते. यावर उपाय काय असा विचार करण्यातच मध्यरात्र झाली. काहीतरी सुचल्यासारखे झाल्यावर त्याने मोबाइल

काढला आणि बॉसला एक लांबलचक मेल लिहून निश्चिंतपणे आडवा झाला. त्याने दोन आठवडे रजा टाकली होती. त्याच्या भरपूर सुट्ट्या बाकी होत्या आणि कामात तरबेज असल्यामुळे बॉस काही जास्त विरोध करू शकणार नव्हता, ही गोष्ट त्याने हेरली होती. या गोष्टीवर  त्याने स्वतःलाच शाबासकी दिली.

सकाळी जाग आली तेव्हा त्याच्यासमोर बरेच जण व्यायाम वगैरे करताना दिसले. मजा म्हणून तो त्यांची गंमत पाहू लागला. तेव्हा इतरांनी त्याला त्यांच्यात सामील करून घेतले. मग चांगला घाम निथळेपर्यंत योगासने, प्राणायाम झाल्यावर अंघोळीसाठी म्हणून कपडे घेऊन  सर्वजण नदीकडे निघाले. सुयोगला हा प्रकार आवडला. स्विमिंग पूल मधील बंदिस्त पाण्यात पोहलेला सुयोग आता नदीतील निर्धास्त आणि बिनधास्त पाण्यात पोहणार होता. त्याला परत लहानपणीचे दिवस आठवले. त्याला आता पावलोपावली या आठवणी येत होत्या. तो हे सर्व लहानपणी अनुभवला होता. पण मध्येच पारखा झाला होता. इतका की आता हे सर्व त्याला नवीनच वाटत होते. गावातील लोकं त्या जथ्थ्याकडे कुतूहलपूर्वक पाहू लागले. नदीचे थंडगार पाणी अंगाला लागताच सुयोग शहारला. मनसोक्त डुंबून झाल्यावर स्वारी परत शाळेकडे निघाली. तो पर्यन्त दूध आलेले होतेच. सकाळच्या कसरतीने आणि पोहण्याने सर्वांना भुका लागल्या होत्या. मग वेळ न

दडवता सर्वांनी दूध प्राशन केले आणि शांत बसून राहिले. आता सर्वांपुढे गहन प्रश्न होता की करायचे काय? कारण अजून दिवसाला फक्त सुरुवात झाली होती. वैशाख महिन्यातील उष्ण दिवस होते ते. नुसत्याच वर्गात बसून काय करणार, त्यापेक्षा मैदानातल्या झाडाच्या सावलीत किंवा व्हरांड्यात बसणे हा एक चांगला पर्याय होता. शेवटी सर्वजण झाडाखाली बसले आणि आता काय करायचे या विषयावर एक परिसंवाद सुरू झाला. त्यांच्यात एक प्राध्यापक महाशय होते, त्यांनी न सांगताच परिसंवादाचे अध्यक्षपद घेतले. हे महाशय पंचक्रोशीत बऱ्यापैकी प्रसिद्ध होते. यामुळे त्यांच्या ओळखीचा आणि प्रसिद्धीचा वापर करून शेजारच्या गावातील वाचनालयातून पुस्तके आणण्याचे ठरले. सर्वांनी एकमताने होकार दर्शवला. लगेचच मागणी पत्र वगैरे तयार झाले आणि संध्याकाळपर्यन्त पुस्तके येतील अशी ग्वाही देऊन प्राध्यापक महोदय भाव खाऊन गेले.

यथावकाश दुपारच्या जेवणाची तयारी झाली. मग जेवणं झाल्यावर वामकुक्षी वगैरे. ठरल्याप्रमाणे सायंकाळी प्राध्यापकांचा विद्यार्थी गोणीभर पुस्तकं घेऊन आला. मग हौशी वाचकांनी लगेचच चांगली पुस्तकं निवडून घेतली. ते मराठी साहित्य बघून सुयोग थोडा ओशाळला. त्याला इंग्रजी साहित्य वाचण्याची आवड. मग त्याने एक कादंबरी हतात घेतली आणि

चाळत बसला. काळोख पडण्याच्या सुमारास परत खिचडीची तयारी सुरू झाली. या स्वैपाकात मात्र मजा होती. कारण थोड्या-थोड्या गोष्टींवरून देखील भांडण होण्याचा संभव असे. म्हणजे तेल इतकेच का टाकले, बटाट्यांची साल का काढली नाही ह्या बाबीदेखील बिनसण्यासाठी पुरेश्या होत्या. पण या भांडणातून होणारी खिचडी मात्र अप्रतिम असे. मग वेगवेगळ्या पाककृती तयार करण्यास सुरुवात झाली. हौशी मंडळी ती. मंडळाच्या साहित्यातून हवे ते समान मिळू लागले. मग बुंदी पडून झाली, जिलेबी झाली, अगदी बलुशाही सुद्धा. रोज मेजवान्या झडू लागल्या. नियतीपण किती विचित्र असते. इकडे जग कोरोनामुळे गर्भगळीत झाले होते आणि मंडळी मात्र मजा करत होती. मनसोक्त आणि आकंठ.

मग असेच दिवस जाऊ लागले. आनंदात, थट्टामस्करी करण्यात. या सोन्याच्या दिवसांची सुयोग मनापासून मजा घेऊ लागला. तो देखील आता त्यांच्यातलाच एक झाला. कामासाठी रात्रभर जागणाऱ्या सुयोगला कोरोनाने जगणं शिकवलं हे मात्र खरं. माणसांतून यंत्रात गेलेला सुयोग परत माणसांत आला. त्याने वाचलेले साहित्य त्याने शतशः अनुभवले. त्याने गावाकडच्या गोष्टी वाचल्या, मिरासदार वाचले, बनगरवाडी वाचली, आनंद यादव झोंबी सकट सगळे वाचले. इथे त्याने खरे साहित्य अनुभवले. ग्रामीण साहित्य.

शुद्ध आणि स्वच्छ. खऱ्या अनुभवांचे एक शब्दचित्र. त्याला त्या इंग्रजी साहित्यापेक्षा हे मराठी साहित्यच जास्त आवडले.

मग यथावकाश चौदा दिवस संपले. संपले कसले, भुर्रकन उडाले. एखाद्या पक्ष्यासारखे. या दोन आठवड्यांत सर्वजण अगदी गुटगूटीत झाले होते. सर्वजण मनसोक्त जगले होते. आयुष्यात पहिल्यांदा. नाहीतर नोकरदार मंडळींना कुठे उसंत. तिकडे लोकं जीव जाण्याची भीती उराशी घेऊन जगत होते, तर या मंडळींनी या दोन आठवड्यांत मनसोक्त जगून परत नवीन संकटांचा सामना करण्यासाठी तयारी करून ठेवली होती. शेवटच्या दिवशी सर्वजण थोडे हळवे झाले. रोज सकाळी नदीवरील आंघोळ आणि सायंकाळी मारुतीच्या पारावर गप्पा या गोष्टींसाठी एकमेकांशी वचनबद्ध होत आपआपल्या गल्लीची वाट धरली.

†††

# हंपीकर नागेंद्र

एप्रिल महिन्याचे कडक ऊन अंगाची लाहीलाही करत होते. हंपी शहरातील, माफ करा विजयनगर साम्राज्याच्या राजधानीतील असंख्य पाषाण उन्हाने तप्त झाले होते. त्यांना बघण्यासाठी म्हणून कुणी आले नव्हते. आता त्यांना त्याची सवय झाली होती. इकडे नागेंद्र देखील घरात चिंतेत बसून होता. नागेंद्र, अठ्ठावीस वर्षांचा तरुण. आई मदयंती आणि वडील मंजूनाथ यांच्यासह नागेंद्र हंपीत रहात होता. ते मूळ कुठचे? हे मंजूनाथला देखील माहिती नव्हते. पण पोटापाण्यासाठी ते हंपीत वास्तव्याला होते, नागेंद्रला एक लहान भाऊ देखील होता, केशव नावाचा. तिथेच गंगावतीला इंजिनीअरिंगचे शिक्षण घेत होता. हंपीपासून गंगावती काही जास्त दूर होते असे नाही, पण हंपीला पर्यटकांची जास्त वर्दळ असल्याने केशव गंगावतीलाच भाड्याच्या खोलीवर राहायचा. तो देखील आता घरीच हंपीला आला होता. नागेंद्र एक गाईड होता. इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व आणि देहबोलीतील आत्मविश्वासामूळे पर्यटक लगेच त्याच्याकडे आकर्षित होत. वडील मंजूनाथ हंपी ते होसपेट रिक्षा चालवत. सकाळी विरुपाक्ष मंदिरात दर्शन घेऊन  निघायचे ते रात्रीच यायचे. मदयंती सकाळपासून दुपारपर्यंत इडली, डोसे वगैरे नाश्ता बनवून विकायची. त्यांच्या घराच्या बाजूला त्यांनी दोन खोल्यादेखील बांधून घेतल्या

होत्या. बॅकपॅकर लोकांसाठी म्हणून तो एक स्वस्तातला होम स्टे होता. थोडक्यात काय तर चारही बाजूंनी रोज थोडा-थोडा का होईना पैसा येत होता. केशवच्या शिक्षणासाठी तोच पैसा पाठवायचे. सर्वकाही सुरळीत चालले होते.

पण मध्येच माशी शिंकली आणि सर्वकाही स्तब्ध झाले. जग बंदच पडले जणू. कोरोना या नावानेच एवढी दहशत घातली होती की सर्व जग ठप्प झाले होते. जवळपास सर्व जगातच लॉकडाउन घोषित केले होते. जग तात्पुरते बंद पडले होते. पर्यटन व्यवसायावर सर्वांत मोठा घात झाला होता. हंपीस्थीत नागेंद्र आणि कुटुंबीय तथा सर्व हंपीवासीय एका मोठ्या विवंचनेतून जात होते. पर्यटक येणे बंद झाल्यामुळे यांचा जीवनप्रवास इथेच थांबतो की काय, अशी परिस्थिती निर्माण झाली होती. पैसे असेपर्यंत ठीक होते, पण जसजसे दिवस लोटले जात होते तसतशी नागेंद्रची चिंता वाढत होती. केशवच्या शिक्षणाला लागणारा पैसा अचानकपणे बंद झाला होता. तो केव्हा सुरू होईल याची शाश्वती नव्हती. सगळ्यांना समजत होते, पण बोलत मात्र कुणीच नव्हते. बोलत होते ते फक्त डोळ्याने. मदयंती आणि मंजुनाथच्या चेहऱ्याकडे बघवले जात नव्हते. दिवसेंदिवस चिंता वाढत होती. केशव मात्र स्वतःला दोष देत दूषणं लाऊन घेत होता. अभ्यासाच्या नावाखाली तो एका कोपऱ्यात खिन्नपणे बसून रहात असे.

घरातील असे वातावरण नागेंद्रकडून नाही बघवले जायचे. मग तो खिन्न आणि उदास मनाने बाहेर पडत असे तो रात्री जेवायलाच घरी येत असे. करण्यासारखे असे काहीच नव्हते. कोरोनारूपी अदृश्य अरि केव्हा आणि कसा वार करेल हे सांगता येत नव्हते. घराबाहेर पडलेला नागेंद्र मग वाट दिसेल तिकडे आणि पाय नेतील तिकडे जात असे. त्याला नवीन असे काहीच नव्हते. कारण तिथली एकूणएक शिळा त्याच्या परिचयाची होती. तोच तर त्यांची ओळख पर्यटकांना करून द्यायचा. हंपीमधील इतर कुटुंबांची स्थिती काही वेगळी नव्हती.

रोज दिवसभर नागेंद्र हंपीत भटकायचा, त्याच्याच धुंदीत. पण नागेंद्र आता जी हंपी पहात होता, ती रोजपेक्षा वेगळी होती. एकेकाळच्या विजयनगर साम्राज्याच्या राजधानीच्या सभोवताली असलेले भग्नावस्थेतले अवशेष बघताना त्याचे मन उद्विग्न होत होते. ही एक नवीन हंपी तो अनुभवत होता. काहीतरी केले पाहिजे, हे त्याला चांगल्या प्रकारे उमजत होते. पण काय केले पाहिजे हा एक विषण्ण प्रश्न त्याची पाठ सोडता सोडत नव्हता. चिंता ही त्याला जळू सारखी चिकटली होती. हातपाय कुठे तरी मारणे आवश्यक होते. नाहीतर बुडून मृत्यू निश्चित होता. तुंगभद्रेच्या काठी, हेमकूट पर्वताच्या माथ्यावर, अंजनेरी पर्वताच्या मारुती मंदिराच्या

शेजारी बसून त्याने कितीतरी सकाळींच्या दुपारी आणि दुपारींच्या सायंकाळी केल्या होत्या.

एकदा रात्री जेवण झाल्यावर घरात सर्वजण निवांत बसले होते. केशव अभ्यास करत होता. बाजूलाच त्याची ढीगभर पुस्तके पडली होती. अचानक विजेचा झटका लागल्यासारखे झाले आणि नागेंद्र तसाच बाहेर आला. मनात विचारांचे थैमान सुरू झाले. त्याचे मन हंपीच्या प्रत्येक मंदिरातून फिरू लागले, एकेक शिळेवरून धडाधड उड्या मारू लागले. त्याने केशवला आवाज दिला. हातातले पुस्तक बाजूला ठेऊन केशव लगेचच बाहेर आला.

“केशव, परीक्षा तर रद्द झाल्या ना, मग कसला अभ्यास करतोस?”

“पुढच्या वर्षाचा.”

“बघ मला कळतय तुझ्या मनात काय सुरू आहे ते. काही अपराधी वाटून घेण्याची गरज नाहीये. फक्त मला मदत कर.”

“कसली मदत.”

“हंपीवर पुस्तक लिहितोय मी उद्यापासून. मी दिवसभरत जे लिहिलेलं असेल ते लॅपटॉपवर टाइप करून देत

जा. आपण ई-बूक प्रकाशीत करू आणि त्यातूनच चरितार्थ भागवू."

"ठीक आहे, नक्की. उद्यापासून सुरू."

नागेंद्रने त्याची योजना घरात सांगितली. सर्वांना आवडली. त्यांनी सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. नागेंद्रला आता कशाचीही उसंत नव्हती. विचारांच्या तंद्रीत त्याला रात्री धड झोप देखील आली नव्हती.

सकाळी उजाडाण्याच्या आत तो घराबाहेर पडला. सोबत लिखाणाचे साहित्य, कॅमेरा आणि प्रफुल्लित मन घेऊन. विजयनगर साम्राज्याचे आराध्य दैवत असलेल्या उग्र नरसिंहाच्या दर्शनाने तथा आशीर्वादाने त्याने लिखाणाला श्री गणेशा केला. भग्नावस्थेत असलेल्या नरसिंहाच्या मुर्तीकडे कितीतरी वेळ तो एकटक पाहताच होता. सात तोंडी आदिशेषावर स्थानापन्न झालेल्या बावीस फूट उंचीच्या नरसिंहाच्या मांडीवर बसलेली लक्ष्मीची मूर्ती त्याला दिसू लागली. बाजूला पाडलेल्या लक्ष्मीदेवीच्या अवशेषातून त्याने मनोमन मूर्तीचे चित्र रेखाटले आणि मनातले बोल कागदावर उतरवू लागला. जवळच असलेल्या बडवलिंग मंदिराकडे तो वळला. तेथील ८६ वर्षांच्या कृष्णा भटांचे आशीर्वाद घेतले. त्यांना मंदिरविषयी खोलवर विचारले. त्यांनी सांगितलेला

प्रत्येक शब्द तो प्राणपणाने ऐकू लागला. कारण कृष्णा भट हे हंपीतील सर्वांत जेष्ठ व्यक्ती तथा पुजारी होते. दुपारच्या जेवणापर्यंत तो तिथेच बसून होता. मग त्याने विरुपाक्ष मंदिराकडे स्वारी वळवली. सांगम घराण्याच्या सूर्योदयाच्या आधीपासून ते सूर्यास्ता नंतर देखील ते मंदिर दिमखात उभे होते. कितीतरी पिढ्या पहिल्या असतील त्या मंदिराने. त्या मंदिराचा एकेक खांब नागेंद्रला त्याची कथा सांगू लागला. मूकपणेच. संगम घराण्याचे सुवर्णयुग पाहिलेली वास्तु होती ती. मंदिराच्या भिंतीवर असणाऱ्या सैनिकांची कोरीव शिल्प त्याच्याशी संवाद साधू लागली. विविध प्राण्यांच्या शिकारींची शिल्पे तो बघू लागला. त्या प्राण्यांच्या चेहऱ्यावरील क्रूर भाव अनुभवू लागला. पटापट छायाचित्रे घेऊ लागला. त्या उंचच उंच गोपूरांसमोर बसून त्यांचीच कहाणी लिहू लागला. सायंकाळ झाली तेव्हा तो भानावर आला.

घरी आला तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर एक वेगळाच विलक्षण अनामिक आनंद होता. त्याचा असा हसरा चेहरा बघून सर्वांना बरे वाटले. जेवण झाल्यावर नागेंद्र आणि केशव सोबत बसले. नागेंद्रने दिवसभरात केलेले लिखाण केशव पटापट टाईप करून घेऊ लागला.

परत दुसऱ्या दिवशी नागेंद्र पहाटेच निघाला. एकतर लॉकडाउन असल्यामुळे हंपीमध्ये कुणीच नव्हते आणि त्यामुळे जो एकांत मिळत होता तो नागेंद्रसाठी अतिशय पोषक होता. त्यामुळे वेळ न दडवता तो विजय विठ्ठल मंदिरात आला. तिथल्या दगडी रथाला बघून थक्क झाला. रोज हाच रथ तो पर्यटकांना दाखवायचा. पण आज अशा एकांतात त्या अप्रतिम वास्तूला बघून त्याला भरून आले. सहजच त्याचा हात खिशात गेला. त्याने पन्नासची नोट काढली. मागील बाजूस तोच रथ होता. आळीपाळीने तो त्याच्या समोर असलेल्या रथाकडे आणि हातात असलेल्या कागदाच्या तुकड्यावर छापलेल्या रथा कडे पाहू लागला. रथाचे चित्र असलेल्या नोटेची किंमत पन्नास रुपये होती आणि खऱ्या रथाची.... ती अगणित होती. ती फक्त पैशाने मोजता येण्यासारखी मुळीच नव्हती. त्या अद्भुत शिल्पाचे वेगवेगळया बाजूंनी छायाचित्र घेऊन झाल्यावर तो मंदिरात गेला. इथे गाभारा आहे पण देव नाही, तो पंढरपूरला. तिथल्या अद्भुत स्तंभातून निघत असलेले सप्तसुर ऐकताना तो बेभान झाला होता. त्या देव नसलेल्या मंदिराची कहाणी लिहिताना त्याच्या मनात संमिश्र भावनांचा कल्लोळ झाला होता. तिथून मग हजारा राम मंदिराकडे स्वारी वळली. इथे खांबच खांब होते. प्रत्येक खांबावर रामायण – महाभारत जीवंत करून ठेवले होते. हे मंदिर म्हणजे हंपीमधील

शिपंचा मेरूमणीच आहे असे नागेंद्रला वाटले. मग तिथेच सायंकाळ झाली.

नागेंद्र घरी येताच केशवने त्याचे काम दाखवले. त्याने अतिशय चोखपणे त्याचे काम बजावले होते. परत रात्री तो कामाला लागला. इकडे नागेंद्रकडून स्वस्थ बसवले जात नव्हते. तो फक्त दिवस उजाडण्याची वाट बघत असायचा. कारण हंपी लॉकडाउनमुळे निर्मनुष्य आहे असे त्याला वाटतच नव्हते मुळी. किंबहुना तो या काळातच नव्हता, तो होता भूतकाळात. सम्राट कृष्णदेवरायांच्या काळात. त्यांच्या राज्यात.

त्याने कृष्णदेवरायांचा महाल बघितला. तिथे त्याला राजकावी तेनाली रामन भेटला. त्याच्या हजरजबाबीपणाने तो आश्चर्यचकित झाला. महाराजांच्या महालात तो एखाद्या लहान मुलांसारखा बागडू लागला. तिथे सर्वजण होते. राजा, राणी, राजकावी, सेनापती, सेना, अगदी सर्वजण. इथे त्याला अडवणारे असे कुणीच नव्हते. महालाबाहेरील सती चौथरा पाहताना मात्र त्याला अश्रु अनावर झाले होते. मग कितीतरी वेळ तो उद्विग्नपणे त्या भग्न वास्तूकडे बघत बसला. हंपी बाजारच्या मधून जाताना त्याने विजयनगर काळातला बाजार

पहिला. तिथे त्याला हिरे, माणकांचे ढीग लागलेले दिसले. अशी अत्युच्च श्रीमंती त्याने पहिल्यांदाच अनुभवली.

असेच एकामागून एक दिवस उलटत गेले. आता हा त्याचा रोजचा दिनक्रमच झाला. सकाळी निघायचे, प्रत्येकवेळी एक नवीन हंपी अनुभवाची, तिला कागदावर उतरवायची. विद्यारण्य स्वामींचा आश्रम, मतांगा टेकडी, हेमकूट पर्वताचा माथा हे सर्व त्याने लिहून काढले.

आता त्याने नवीनच सुरू केले. रोज सायंकाळी तुंगभद्रेच्या काठी जाऊन चिंतन, मनन करू लागला. खडकाळ टेकड्यांच्यामधून वाहणाऱ्या तुंगभद्रेच्या काठी असलेल्या शिळा गतवैभवची साक्ष देत होत्या.

यथावकाश महिनाभर खपून दोघं भावांनी मिळून इंग्रजीमध्ये पुस्तक बनवले. त्यात सर्व हंपी समवलेली होती. अप्रतिम छायाचित्रे, तशीच शब्दरचना यामुळे पुस्तक गाजेल असा आत्मविश्वास त्या परिवाराला आपसूकच निर्माण झाला. मग प्रूफ रीडिंग वगैरे झाल्यावर ऑनलाईन विक्रीसाठी म्हणून पुस्तक आपलोड केले. अल्पावधीतच पुस्तकाला अप्रतिम प्रतिसाद मिळाला. हजारोंच्या संख्येने पुस्तक डाउनलोड झाले. अभिनंदन आणि अभिप्रायाचे फोन अविरतपणे सुरू झाले. इतके की नागेंद्रला उसंत मिळेनासी झाली.

मध्येच त्याला एक नवीन कल्पना सुचली. टूर पॅकेज डिझाईन करण्याची. मग काय, परत अंग झटकून नागेंद्र कामाला लागला. यात त्याने मंजूनाथ आणि मदयंतीची मदत घेतली. होसपेटहून पर्यटकांना आणण्यापासून त्यांचे जेवण, निवासाची व्यवस्था आणि हंपी दर्शन ते परत होसपेट पर्यंत पोहोचवणे इथपर्यंत कार्यक्रमाची आखणी झाली. घरचीच रिक्षा, सुगरण आई, घरातीलच दोन खोल्या आणि स्वतः एक निष्णात गाईड एवढं सगळं असल्यानंतर पॅकेज यशस्वी नाही झाले तर नवलच. या पॅकेजची सुरुवात त्याने डिसेंबर २०२१ पासून सुरुवात करण्याचे ठरवले आणि अहो आश्चर्यम. पुस्तकाप्रमाणेच हे पॅकेज देखील खूप यशस्वी झाले. काहींनी तर प्री-बुकिंग साठी संपर्क साधायला सुरुवात केली.

परत आनंदाचे दिवस सुरू झाले. दिवसागणती पुस्तकाचा खप वाढत होता आणि नागेंद्र त्या प्रत्येक शिळेला धन्यवाद देत कृतकृत्य होत होता. लॉकडाउनने त्याला एका सर्वसामान्य गाईड पासून प्रसिद्ध लेखक बनवले होते.

†††

## ई साहित्य प्रतिष्ठानचं हे तेरावं वर्ष.
## शुभम पाटील यांचं ई साहित्यवरचं हे तिसरं पुस्तक.

शुभम हे अत्यंत अल्पावधीत लोकप्रिय झालेले लेखक. त्यांचे मोडी हे पुस्तक नेटवरच्या विक्रीचे सर्व उच्चांक मोडीत काढणारे. त्यांची लेखन शैली स्पष्ट आणि प्रयोगशील आहे. सतत काहीतरी नवीन करावे, नवीन शिकावे असे त्यांना वाटाते आणि त्यांच्या या कोलंबसी वृत्तीचा प्रत्यय त्यांच्या लिखाणातून येतोच. आपल्या लेखनावर वाचकांच्या प्रतिसादांना ते अत्यंत गंभीरपणे घेतात आणि आपली शैली सुधारत नेतात.

असे अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. मोठ्या लेखकांच्या तोडीस तोड आहेत. पण त्यांना योग्य असा प्लॅटफ़ॉर्म मिळत नाही. त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकांची विक्री होईल की नाही याबद्दल प्रकाशक साशंक असतात. आणि जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आलीच नाहीत तर लोकांना त्यांचे नांव कळणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक तरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या.

पण आता असे होणार नाही. इंटरनेटच्या सहाय्याने नवलेखकांना वाचकांच्या नजरेपर्यंत पोहोचवण्याचे काम आता अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान ही त्यातील एक.

सुमारे ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. आणि आज ना उद्या लेखकांना भरघोस मानधन मिळवून देण्यासाठी ई साहित्य प्रतिष्ठानचे प्रयत्न चालू आहेत. नवीन लेखक यायला हवेत. भक्कमपणे उभे रहायला हवेत. त्यांना त्यांच्या त्यांच्या दर्जानुसार मानमरातब मिळावा. मानधन मिळावे. परदेशातील आणि सर्वदूर कानाकोपऱ्यातल्या खेड्यापाड्यांवरील नववाचकांना दर्जेदार साहित्य मिळावे. याच आमच्या प्रेरणा आहेत. नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना त्यांच्या कसानुसार प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. सुरूची नाईक, प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, निरंजन कुलकर्णी, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता

देशपांडे, सौरभ कोरगांवकर, मिलिंद कुलकर्णी, शुभम पाटील, आशिष कर्लें, सुरेंद्र पाथरकर, प्रीती सावंत दळवी, निमिष सोनार, उमा कोल्हे, गणेश ढोले, सचिन तोडकर, महेश पाठाडे, अभिजीत पैठणपगारे, कार्तिक हजारे, किरण दशमुखे, जगदिश खांदेवाले, माधुरी नाईक, विशाल दळवी, गौरी कुलकर्णी, जितेश उबाळे, प्रितम साळुंखे, प्रतिक म्हात्रे असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. इंटरनेटवर हौशी मराठी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ौज मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

बस्स. अजून काय पाहिजे?
सुनीळ सामंत
टीम ई साहित्य प्रतिष्ठान